अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | सोमवार, दि.३० जानेवारी २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : १२४ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

## अंडर-१९ महिला टी-२० विश्वषकावर भारताने कोरले नाव



सुराज्य/पुणे : क्रिकेटच्या इतिहासात पहिल्यांदाच पार पडणाऱ्या अंडर-१९ महिला टी-२० विश्वचषकात महिला संघाने भारताचे नाव कोरले आहे. आजच्या अंतिम सामन्यात भारताने इंग्लंडवर मात करत मोठा विजय मिळवला आहे. शेफाली वर्माच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या भारतीय संघाने गोलंदाजी, क्षेत्ररक्षण आणि फलंदाजीत उत्तम कामगिरी केली. भारताने ७ विकेट्स राखून या सामन्याचा इतिहास घडवला आहे. नाणेफेक जिंकून भारतीय संघाने प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर मैदानात फलंदाजी करण्यासाठी उतरलेला इंग्लंड संघ अवघ्या ६८ धावांत गुंडाळला गेला. भारताने हे आव्हान सहजरित्या पूर्ण करत इंग्लंडवर दणदणीत विजय मिळवला. शेफालीनेही ७ सामन्यांत १७२ धावा केल्या. तर गोलंदाजीत पार्श्वी चोप्राने भारताकडून सर्वाधिक ११ विकेट्स घेतल्या आहेत. तितास संधू, अर्चना देवी आणि पार्श्वी चोप्रा यांनी प्रत्येकी २ विकेट्स घेतल्या.

# शेकडो नवरदेवांच्या स्वप्नांचा चुराडा
# चिडलेल्या तरूणांनी बार्शीत केला राडा

सुराज्य/बार्शी

**‘नोकरी नाही म्हणून छोकरी भेटत नाही’,अशी सध्याच्या पंचवीसी व तिसीतील तरूणांची अवस्था. दैवीकृपेने लग्न जमलेच तर आडवे मांजर जात असते किंवा विवाह ठरवायचा झाल्यास नशीब साथ देत नाही. या चिंतेने लग्नाळू तरूण वैतागले आहेत. पालकही हैराण झाले आहेत. अशा बिकट स्थितीत सोलापूरसह परिसरातील शेकडो तरूणांची फसवूणक झाली आहे. नवरी देण्याचे आमिष दाखवून बार्शीतील एका महिलेने नवरदेवांच्या नातेवाईकांकडून लाखो रूपये उकळले पण लग्न जुळवण्यासाठी आल्यानंतर नवरीच आल्या नाहीत.आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर संतापलेल्या तरूणांनी भर मंगल कार्यालयातच राडा केला.प्रकरण पोलीस ठाण्यापर्यंत गेले.त्या महिलेसह तिघांना ताब्यात घेतले.आपल्याला आता सहचरणी भेटेल या अपेक्षेने आलेल्या नवरदेवांच्या स्वप्नाचा चुराडा झाला.**

विवाहोइच्छुक युवकांना नवरी देण्याचे आमिष दाखवून त्यांना विवाहासाठी नवरी न देता लाखो रूपयांचा गंडा घालणाऱ्या अनेकांपैकी तिघांवर बार्शी तालुका पोलीसांत फसवणुकीचा गुन्हा दाखल झाल्याने वधू-वर सूचक मंडळांमध्ये खळबळ माजली आहे. फसलेला युवक दीपक गणपत खांडे (रा.अंबड, जि.माढा) याने याप्रकरणी फिर्याद दिली. अंजली श्रीमंत धावणे (रा. सुभाषनगर ता. बार्शी), कैलास विठ्ठल नायकंदे (रा. पाटसांगवी ता. भूम जि.उस्मानाबाद), रामा खैरे (रा. पाचपिंपळा, ता. परांडा जि.उस्मानाबाद) अशी गुन्हा दाखल झालेल्या संशयितांची नावे आहेत.

सध्या मुलांच्या तुलनेत उपवर मुलींची संख्या कमी आहे. त्यामुळे अनेक युवकांना विवाहासाठी नवरी मिळणे अवघड झाले आहे. याचा कांहीजण गैरफायदा घेताना दिसत आहेत. अशा विवाहोच्छुक युवकांना किंवा त्यांच्या नातेवाईकांना फसविण्याच्या घटना घडत आहेत. असाच प्रकार बार्शीतही घडला. यातील संशयित अंजली धावणे यांनी सुशिक्षित महिला मराठा वधू-वर परिचय मेळावा अशा गोंडस नावाखाली विवाहोच्छुक अनेक युवकांचे परिचय पत्र घेतले. सुमारे ३०० च्यावर युवकांची त्यांच्याकडे परिचय पत्रे असल्याची माहिती समोर येत आहे. आश्रमातील मुली विवाहासाठी आपल्याला दाखवू असे सांगून एजंटाकरवी जमेल तसे ३ हजारांपासून २० हजार रूपयांपर्यंत रक्कम उकळली. सुरूवातीला भूम आदी ठिकाणी मेळावे घेवून मुलगी दाखविण्यासाठी काहींना विवाहासाठी पुढच्या तारखा दिल्या तर कांहीना लग्नाच्या तयारीनिशी येण्याचे सांगितले होते. बार्शीत शनिवार दि. २८ रोजी तिसरा मेळावा घेण्यात आला. यावेळी आज आपले लग्न होणार या आशेने कांहीजण मामाबरोबर नवरीसाठी दागदागिने, कपडेलत्ते अशा तयारीनिशी आले होते. तिथे आल्यानंतर मुलगी दाखवू व लगेच लग्न असे काहींना सांगितले होते. त्यामुळे बार्शी बाहयवळण रस्त्यावर असलेल्या किलचे यांच्या मंगलकार्यालयात विवाहोच्छुक युवक व त्यांच्या नातेवाईकांची तोबा गर्दी झाली होती. मेळावा सुरू झाल्यानंतर तिथे वधू म्हणून एकही मुलगी आलेली नव्हती. त्या मेळाव्यातही पुढील महिन्यातील तारीख दिल्यानंतर कांही पालकांचा व युवकांचा संयम सुटला. काहींनी पोलिसांना माहिती दिल्यानंतर बार्शी तालुका पोलीस स्टेशनचे पोलीस कर्मचारी घटनास्थळी आले. पोलिसांनी अंजली धावणे व त्यांच्या कांही एजंटांची चौकशी केली. त्यांच्याकडे अनेक मुलांचे परिचय पत्र होते परंतु एकाही मुलीचे परिचय पत्र त्यांच्याकडे नव्हते व वधू-वरांचा परिचय मेळावा असताना एकही वधू तिथे उपस्थित नव्हती. अनेकांनी त्यांच्याकडून पैसे उकळल्याचे सांगितले. तक्रारीत तथ्य असल्याचे समोर आल्यानंतर धावणे व त्यांच्या सोबतच्या ७-८ महिला एजंटांना ताब्यात घेतले. तक्रारदारांची यादी केल्यानंतर रात्री उशीरापर्यंत गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते.

### अवघ्या तिघांवरच गुन्हा कसा?

फसवणूक झालेल्या युवकांमध्ये बार्शीसह, सोलापूर, उस्मानाबादसह इतर जिल्ह्यातील युवकांचा समावेश आहे. दुपारी ३ च्या सुमारास हा प्रकार घडल्यानंतर रात्री १० पर्यंत गुन्हा दाखल करण्याचेच काम सुरू होते. धावणे यांच्यासोबत या फसवणुकीत अनेकजण सामील असताना फक्त तिघांवरच गुन्हा कसा दाखल झाला ? असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. या प्रकरणात शेकडो जणांची फसवणूक होवून फसवणुकीची रक्कमही कांही लाखांत आहे. त्यामुळे लोकांच्या मजबुरीचा गैरफायदा घेवून आपली पोळी भाजणाऱ्या अशा प्रवृत्तींचा बिमोड करण्यासाठी वरिष्ठांनी यात लक्ष घालण्याची गरज आहे. तरच अशा प्रवृत्तींना आळा बसणार आहे.

### सामाजिक बदनामीची भीती...

सामाजिक बदनामीची भीती तसेच नाते संबंधाच्या नामुष्कीमुळे अनेक तरूणांचे पालक तक्रार करण्यास पुढे आले नाहीत.जर तसे धाडस त्यांनी दाखवले असते तर केस स्टॅन्ड झाली असती परंतु पालकांनी पाऊल मागे घेतल्याने त्या तिघांना गेट जामीन मिळाला. आता घेतलेले पैसे परत देण्याचा प्रकार सुरू असून उकळलेल्या पैशांपेक्षा कमी रक्कम पालकांच्या हातावर टिकवली जात आहे,अशी बार्शी शहरात चर्चा होते आहे.

## नवरींचे आमिष दाखवून महिलेने लग्नाळूंना घातला लाखोंचा गंडा



## उजनीचा डावा कालवा फुटल्याने पाटकूल भागात शेतीत पाणी

चिखली : मोहोळ तालुक्यातील पाटकूल शिवारातून जाणारा उजनीचा डावा कालवा दि. २९ रोजी सकाळी ६ वाजण्याच्या सुमारास खरात वस्ती येथे फुटून या परिसरातील शेतीचे मोठ्याप्रमाणात नुकसान झाले आहे .

खरात वस्तीजवळ फुटलेला कालवा हा साधारण ५० वर्षाहूनही जुना आहे. मोहोळ सह पंढरपूर तालुक्यातील शेकडो एकरातील पिके पूर्णपणे पाण्यात गेली आहेत . जवळपास चार ते पाच विहिरींमध्ये गाळ जाऊन विहिरी पुर्ण भरलेल्या आहेत . विशेष म्हणजे - काढणीला आलेले द्राक्ष, डाळिंब , आदी फळपिकासह ऊस, ज्वारी , गहू , हरभरा , आदी पिके सुध्दा पाण्याखाली गेली आहेत . शिवाय अनेकांच्या घरामध्येही पाणी शिरल्याने नुकसान झाले आहे . उजनीतून सोडण्यात आलेल्या पाण्याचा तास भर वेग सुरू होता . उजनीतून पाणी सोडणे बंद केल्यानंतर दुपारी १ वाजण्याच्या दरम्यान उजनी कालव्याचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले होते . महसूल प्रशासनाच्या



अधिका-यांना माहिती देऊन नुकसानीचे पंचनामे करण्याच्या सूचना दिल्या आहेत . नुकसानीचा आकडा सुध्दा मोठा असल्याने शेतकरी चिंतातुर झाले आहेत .

## औजच्या दोन बालकांना पळून नेणाऱ्या आईला व प्रियकरला चार तासात अटक

### मंद्रुप पोलिसांची कामगिरी

सुराज्य/दक्षिण सोलापूर

दक्षिण सोलापूर तालुक्यातील औज मंद्रुप येथील दोन बालकांच्या अपहरण प्रकरणी त्यांची आई व तिच्या प्रियकरला अवघ्याच्या चार तासात मंद्रूप पोलिसांनी अत्यंत शिताफिने अटक केली.पोलिसांनी कसून तपास केल्यानंतर सांगली गाठून त्या बालकांना ताब्यात घेवून सोलापूर गाठले.

याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी कि- दि. २८जानेवारी रोजी सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास औजचे फिर्यादी प्रकाश अण्णाप्पा कोळी (वय ४९) यांनी अज्ञात व्यक्तींविरूध्द आपल्या दोन मुलांचे अपहरण केल्याची तक्रार दाखल केली होती.आपली मुलगी मधुरा वय १० वर्षे व मुलगा वय ८ वर्षे हे दोघे आमच्या गावातील घरातून माझे आईकडून शेतातील घरात माझ्याकरिता जेवणाचा डब्बा घेऊन निघाले होते.

परंतु ती माझ्याकडे न पोहचल्याने मी गावातील घरी जाऊन चौकशी केली असता माझ्या आईने दोन्ही मुले ही तुझ्याकडेच गेल्याचे सांगितले. त्यानंतर रात्री व दि. २८ रोजी दिवसभर मुलांचा गावात, नातेवाईकांकडे शोध घेतला परंतु ती मिळून न आल्याने कोळी यांनी पोलिसांत तक्रार दिली. त्यानुसार मंद्रुप पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.

दोन लहान मुलांना पळवून घेऊन गेल्याचा संवेदनशील व गंभीर गुन्ह्याची माहिती मिळताच सदर गुन्ह्याचा तपास मंद्रुप पोलीस स्टेशनाचे प्रभारी अधिकारी सपोनि रवींद्र मांजरे यांनी स्वतः कडे घेऊन तत्काळ या मुलांच्या शोधाकरिता दोन पथके तयार करून पाठवली. मांजरे यांनी औज गावाला भेट देऊन गोपनीय व परिस्थितीची माहिती घेतली.

पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांना सदर गुन्ह्याची माहिती दिली. मंद्रुप पोलीस स्टेशन कडील गुन्हे शोध पथकातील संदीप काळे व दिनेश पवार यांना त्यांच्या बातमीदाराकडून माहिती मिळाली कि, सदरची दोन्ही मुले ही त्यांच्या आईनेच रात्री येऊन गुपचूप घेऊन गेली आहे. त्यांनी सदरची माहिती सपोनि मांजरे यांना दिली.

मांजरे व अमोल भारती यांनी फोन वरून सदर मुलीच्या आईसोबत बोलणी करून मुले सुरक्षित असल्याची खात्री केली. हवालदार वाघमोडे व पथक यांनी जाऊन मंद्रुप पोलिसांनी पुरवलेल्या माहितीप्रमाणे त्यांना ताब्यात घेतले.

ह्या गुन्ह्यात मुलांच्या आईला मुले पळवून घेऊन जाण्यात मदत करणारा इसम व आईस आरोपी करण्यात आले असून आईला नोटीस देऊन सोडू न देण्यात आले असून आईला मदत करणाऱ्या तिच्या प्रियकर इसमास न्यायालयीन कोठडी देण्यात आली.

सदरची कामगिरी सरदेशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्ह्याचे तपासी अधिकारी सहाय्यक निरीक्षक रवींद्र मांजरे, फौजदार अमितकुमार करपे, हवालदार अंगद गिते , राहुल महिंद्रकर, प्रमोद असादे, मोहन मनसावले, पोलीस नाईक अविनाश पाटील,संदीप काळे, दिनेश पवार, सागर चव्हाण, संजय कांबळे, मपोशि दिक्षिता दोडतले, चालक हनुमंत जाधव यांनी केली.

## करणीच्या संशयावरून महिलेस वरवंट्याने मारून दात पाडले; पतीच्या मित्राला अटक

सुराज्य/सोलापूर

आपला मोबाईल नंबर ब्लॅकलिस्ट मध्ये टाकले, शिवाय करणी केल्याच्या संशयावरून महिलेस लाथाबुक्याने मारहाण करीत खाली पाडले. आणि वरवंट्याच्या दगडाने तोंडावर मारून चार दात पाडल्याची घटना नवीन घरकुल कुंभारी (ता.दक्षिण सोलापूर) येथे शुक्रवारी सकाळच्या सुमारास घडली. या प्रकरणात वळसंगच्या पोलिसांनी जखमी महिलेच्या पतीच्या मित्राला अटक करून दोन दिवसाची पोलीस कोठडी घेतली आहे.

हिना सद्दाम बागवान (वय २५ रा. क विभाग घरकुल, कुंभारी) असे जखमी झालेल्या महिलेचे नाव आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी अजिज शेख (वय ३० रा.घरकुल, कुंभारी) याला अटक करून दोन दिवसाची पोलीस कोठडी घेतली. आरोपी अजिज शेख हा मजुरी करीत असून तो जखमी हिना यांच्या पतीचा मित्र आहे. हिना बागवान या शुक्रवारी सकाळी घराजवळ काम करीत होत्या. त्यावेळी आजिज हा तेथे येऊन, तु माझा मोबाईल नंबर ब्लॅकलिस्टमध्ये का टाकली? तू मला करणी केली आहे, तुला सोडत नाही तुझ्या तोंडाला यापुढे कोणीही बघू नये, असे म्हणत बुक्क्याने मारून त्यांना खाली पाडले आणि त्यांच्या घरातील वरवंट्याच्या दगडाने त्यांच्या तोंडावर मारले. त्यात त्यांच्या तोंडातील ४ दात पडून गंभीर जखमी झाल्या. अशी नोंद पोलिसात झाली. पुढील तपास सहाय्यक फौजदार सोनकांबळे करीत आहेत.

## कुऱ्हाडीने खुनाचा प्रयत्न; महिलेसह चौघांविरुद्ध गुन्हा

सोलापूर : सोलापूर-आमच्या घराबद्दल गावात वेळेवाकडे बोलून बदनामी करतो या कारणावरून एका २३ वर्षीय तरुणाला कुऱ्हाड, लोखंडी रॉड आणि काठीने मारहाण करून गंभीर जखमी करण्यात आले. ही घटना पोफळी (ता.मोहोळ) येथे शुक्रवारी रात्रीच्या सुमारास घडली. या प्रकरणात मोहोळच्या पोलिसांनी एका महिलेसह चौघाविरुद्ध खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल केला आहे.

विजय राजेंद्र चटके (वय २३ रा.पोफळी ता.मोहोळ) असे गंभीर जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे. त्याला सोलापुरातील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्याने दिलेल्या फिर्यादीवरून महेश पांडुरंग कांबळे, त्याचा मुलगा मंगेश कांबळे,सावित्रीबाई पांडुरंग कांबळे आणि गणेश तानाजी काळे (सर्व रा.पोफळी) या चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला. विजय चटके हा दुचाकीवरून त्याचा घरा पाठीमागील चौकात गेला होता. त्यावेळी चौघांनी त्याला आमची गावात बदनामी करतो का? असे म्हणत बेदम मारहाण केली. सहाय्यक निरीक्षक डुनगे तपास करीत आहेत .

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




विकास मानवाचा, अधोगती आपली!!

# जिल्हा योजनेचा चालू वर्षाचा ५०२.९५ कोटींचा आराखडा

**● १६६.७६ कोटींच्या अतिरिक्त निधीची मागणी ● विकासासाठी भरीव निधी देण्याचे उपमुख्यमंत्र्यांचे आश्वासन**

सुराज्य/सोलापूर

सोलापूर जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी भरीव निधी देऊ अशी ग्वाही राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तथा वित्त व नियोजन मंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२३-२४ चा प्रारूप आराखडा अंतिम करण्यासाठी सह्याद्री अतिथीगृह येथून दूरदृश्य प्रणालीद्वारे आयोजित राज्यस्तरीय बैठकीच्या माध्यमातून फडवीस बोलत होते. यावेळी पालकमंत्र्यांच्या माध्यमातून १६६.७६ कोटींची अतिक्ति मागणी करण्यात आली.



आढावा बैठकीप्रसंगी जिल्हाधिकारी शंभरकर, आ. सातपुते आदी.
(छाया : नागेश दंतकाळे)

या बैठकीस पालकमंत्री तथा जिल्हा नियोजन समितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील प्रवरा लोणी (जि. अहमदनगर) येथून जिल्हाधिकारी कार्यालय येथून खासदार डॉ. जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामी, आ. सर्वश्री सुभाष देशमुख, सचिन कल्याणशेट्टी, राजेंद्र राऊत, राम सातपुते यांच्यासह जिल्हाधिकारी तथा जिल्हा नियोजन समितीचे सदस्य सचिव मिलिंद शंभरकर, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी, पोलीस आयुक्त राजेंद्र माने, पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, जिल्हा नियोजन अधिकारी पुंडलिक गोडसे, पालकमंत्री यांचे विशेष कार्य अधिकारी यशवंत माने आदिंसह प्रमुख विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्ह्याच्या विकासासाठी अतिरीक्त १६६.७६ कोटी रूपयांची मागणी प्रस्तावित करण्यात आली. यामध्ये कृषि व संलग्न सेवा, ग्रामविकास, लघुपाटबंधारे, ऊर्जा विकास, उद्योग व खाणकाम, सामाजिक व सामूहिक सेवा, नाविन्यपूर्ण योजना, पशुसंवर्धन, रस्ते व नगर विकास, शिक्षण विभाग, पर्यटन विकास आदिंसाठी प्रामुख्याने ही अतिरीक्त निधीची मागणी करण्यात आली आहे.

---

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) २०२३-२४ चा प्रारूप आराखडा व सन २०२२-२३ मधील यंत्रणास्तरावरील झालेल्या निधी खर्चाची, तसेच गत पाच वर्षात राज्यस्तरीय बैठकीत मिळालेल्या वाढीव निधीच्या खर्चाची टक्केवारी जवळपास १०० टक्के असल्याची माहिती दिली.जिल्हाधिकारी तथा जिल्हा नियोजन समितीचे सदस्य सचिव मिलिंद शंभरकर यांनी यावेळी बैठकीत दिली.

# सौर उर्जेचे भवितव्य

महावितरण कंपनीची आर्थिक स्थिती दिवसेंदिवस खालावत चालली आहे. वीज देयक न भरण्याची शेतकऱ्यांची मानसिकता तसेच वसुलीच्या मोहिमेत आड येणारे सरकारचे धोरण यामुळे महावितरणचे अधिकारी वैतागून गेलेले असतील. महावितरण जगले काय किंवा मान टाकली काय? त्याच्याशी सरकारचे काहीच सोयरसुतक नसते.त्यांना हवी असतात लोकांची मते. लोकांच्या पदरात जास्तीत जास्त आश्वासने टाकली कि मतांची बेगमीही वाढते, अशी राजकिय पक्षांची धारणा झाली आहे. विजेच्या बाबतीत थट्टेखोर भूमिका घेऊन चालत नाही. कारण पैसा आला तरच नवे प्रकल्प उभे राहू शकतील. वीज उत्पादनाचा खर्च भागू शकेल. अन्यथा नाही. महावितरण म्हणजे ब्रह्मदेव नव्हे. वीज उत्पादनासाठी छू मंतर म्हटले की पैसा येणार आहे? वीज ही राष्ट्रीय संपत्ती आहे. लोकांनी सहकार केले तरच वीज देता येईल. शेती क्षेत्रासाठी दिवसा वीज हवी आहे. महावितरण ती देऊ शकत नाही. कारण जितकि मागणी आहे, तितकि वीज उपलब्ध होत नसल्याने टप्प्याटप्प्याने वीज दिली जाते. त्यामुळे शेतीसाठी रात्री वीज पुरवठा केला जातो. कृषी पंपाचा ४८ हजार ५४२ कोटींच्या थकबाकिचा बोजा असलेल्या महावितरणकडून शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळू शकेल का, हा प्रश्न आहे. सौरऊर्जा योजनेच्या निमित्ताने तो चर्चेत आला आहे. कंपनीच्या वीज देयकांची एकूण थकबाकि ७८ हजार ३६१ कोटी आहे. त्यातील ४८ हजार ४४२ कोटींची थकबाकि कृषीपंपांची आहे. जेव्हा अधिक चांगले उत्पादन असते, तेव्हाही अनेक शेतकरी वीज देयक भरत नाहीत आणि नैसर्गिक संकटाच्या काळात तर देयक भरतच नाहीत. गेल्या १५ वर्षांत ४४ लाख कृषीपंपधारकांपैकि तीन लाख २३ हजार बागायतदार शेतकऱ्यांनी एकदाही वीज देयक भरलेले नाही. केवळ त्यांचीच थकबाकि पाच हजार २१६ कोटी रुपये इतकी आहे. अशा स्थितीमध्ये शेतकऱ्यांना दिवसा वीज देता येऊ शकेल काय, असा विचार सुरू झाला आहे. वीज देयकांची वसुली एका



बाजूने सुरू असतानाच विजेचा मूळ भार सौरऊर्जेकडे वळविण्याच्या योजनेला राज्यात वेग येऊ लागला आहे, हे एक सुचिन्ह म्हणावे लागेल. वीज वितरण कंपनीची हलाखीची स्थिती लक्षात घेता शेतीला लागणारी वीज सौरऊर्जेकडे वळविण्याच्या योजनांना पुन्हा वेग दिला जात आहे. त्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी ही योजना सुरू करण्यात आली आहे. शिंदे-फडणवीस सरकार आल्यानंतर जून महिन्यात घेण्यात आलेल्या बैठकिमध्ये एकूण वीज वाहिन्यांपैकि ३० टक्के वीज वाहिन्या या सौरशक्तीवर रूपांतरित करण्याचे धोरण आखण्यात आले आहे. राज्यात वापरल्या जाणाऱ्या २० हजार १२८ मेगावॅट वीजभारपैकि १३ हजार ८८ मेगावॅट वीजभार कृषिक्षेत्राला लागतो. यातील तीन हजार ३१२ मेगावॅट वीज सौर वाहिन्यांवर शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्याचे नियोजन केले जात आहे. यासाठी राज्यातील ८ हजार ४९८ वीज वाहिन्या सौरशक्तीला जोडण्याचे नियोजन करण्यात आले आहे. सौरऊर्जेवर कृषी पंपाची वीज आल्यास आपोआप दिवसा वीज देण्याचे प्रश्न सुटतील, असे जाणकारांना वाटते. राज्यात सौरशक्तीच्या आधारे सौर वाहिनी सुरू करण्यासाठी सौर पटल बसविणे आणि सौरऊर्जा निर्मितीसाठी मोठ्या प्रमाणात जमीन लागणार आहे. ही योजना कार्यान्वित करण्यासाठी प्रत्येक वीज वितरण उपकेंद्राजवळ किमान पाच एकर परिसरात सौरपटल बसवून ऊर्जा निर्मिती करण्याचे ठरविण्यात आले असून, प्रत्येक उपकेंद्राच्या परिसरात 'गायरान बँक' तयार केली जात आहे. राज्यात ३,५१२ मेगावॅट सौरऊर्जा निर्माण करून ती शेतीला वापरण्यासाठी १४ हजार ४० एकर जमीन लागणार असल्याचा अंदाज आहे. त्या दृष्टीने आता गायरान जमिनींचा शोध सुरू करण्यात आला असून, मराठवाड्यात ३,७५०, विदर्भात २,०२६, पश्चिम महाराष्ट्रात ४,४३३ तर उर्वरित महाराष्ट्रात ३८४० एकर जमीन मिळावी, असे प्रयत्न सुरू झाले आहे. बहुतांश ठिकाणी सरकारी जमीन उपलब्ध आहे. ज्या उपकेंद्राशेजारी जमीन उपलब्ध नाही तिथे ती भाड्याने घेण्याची तरतूदही करण्यात आली आहे. खाजगी जमीन मिळेल की नाही, याविषयी साशंकता आहे. त्यामुळे सरकारी जमीनच बघावी लागेल. महाविकास आघाडी सरकारच्या काळात ऊर्जा क्षेत्रात वीज निर्मितीसाठी लागणारा कोळसा पुरवठ्यातही यंत्रणेची दमछाक होत होती. त्यामुळे नवे प्रकल्प रखडलेलेच होते. आता पुन्हा कृषी वाहिन्या सौर ऊर्जेत रूपांतरित करण्याचा हा प्रकल्प महत्त्वाकांक्षी या श्रेणीत गेला आहे.शेतकऱ्यांचा त्याला कितपत प्रतिसाद मिळतो,यावरच या सौर योजनेचे भवितव्य अवलंबून असेल.

## बाह्य कचऱ्याच्या आधी
# आंतरिक अशुद्ध विचारांची स्वच्छता अत्यंत आवश्यक

पुण्यतिथीविशेष

दरवर्षी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त ३० जानेवारी हा दिवस 'नॅशनल क्लिनलीनेस डे' म्हणून साजरा करून खऱ्या अर्थाने त्यांना आदरांजली वाहिली जाते. कारण गांधीजींनी त्यांच्या विचारात आणि कार्यात स्वच्छतेला विशेष स्थान दिले होते. त्यांचे विचार आणि स्वच्छतेचे महत्त्व समजून प्रत्येकाने हे सद्‌गुण आपल्या जीवनात आत्मसात केले पाहिजेत. स्वच्छ वातावरण प्रत्येकासाठी आनंददायी असते. पर्यावरण स्वच्छ व निरोगी ठेवणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे. हा दिवस घरामध्ये-घराबाहेर, कामाची ठिकाणे, गल्ल्या/रस्ते आणि सार्वजनिक ठिकाणी स्वच्छतेच्या उच्च मानकांचे पालन करण्याचे आवाहन करतो. स्वच्छता राखणे हा निरोगी जीवनाचा अत्यावश्यक भाग आहे, त्याचप्रमाणे स्वच्छता आणि सफाई ही आपल्या दैनंदिन जीवनात महत्त्वाची भूमिका बजावते. कुटुंबातील ज्येष्ठांनी मुलांना आपले वातावरण स्वच्छ ठेवण्याची गरज शिकवली पाहिजे. प्रदूषण आणि अस्वच्छतेच्या घातक धोक्याबद्दल लोकांचे अज्ञान त्यांना वेदनादायक मृत्यूच्या उंबरठ्यावर आणते.

जेव्हा स्वच्छतेचा प्रश्न येतो तेव्हा माणूस फक्त स्वतःचा विचार करतो समाजाप्रति असलेल्या कर्तव्याचा नाही. लोक नेहमी सर्वत्र अस्वच्छता पसरवताना दिसतात. घाणीमुळे डास, माश्या, कीटक, विषाणू निर्माण होतात व पर्यावरण प्रदूषित होऊन रोगराई पसरते. आपण ज्या वातावरणात राहतो तेच वातावरण आपण गलिच्छ बनवीत आहोत, ही सर्वांसाठी शरमेची बाब आहे. विकसित देशांमध्ये स्वच्छतेवर विशेष भर दिला जातो, स्वच्छतेशी संबंधित समस्येसाठी जबाबदार व्यक्तीला तुरुंगवास आणि मोठ्या प्रमाणात दंडाची शिक्षाही दिली जाते. जेव्हा परदेशात स्वच्छताविषयक कायदे कडक असतात तेव्हाच तेथील परिसर इतका सुंदर, स्वच्छ आणि प्रगतिशील दिसतो. कारण कायदे शिस्तबध्द पद्धतीने पाळले जातात.



आपल्या देशात स्वच्छतेबाबत जागरूकता नसल्यामुळे अनेक निसर्गरम्य ठिकाणे, नद्या, तलाव, समुद्रकिनारे, ऐतिहासिक वास्तू, किल्ले, पर्यटन व धार्मिक स्थळे इत्यादी ठिकाणी मोठ्या प्रमाणात घाण आणि कचरा दिसून येतो. शहरात कुठेही उघड्यावर कचरा जाळणे हा कायदेशीर गुन्हा आहे. कचरा जाळल्याने वातावरणात विषारी वायू पसरतो. तरीही अनेकजण उघड्यावर कचरा जाळतात. लोकांना ना सरकारची भीती ना समाजाची, प्रत्येकजण आपापल्या स्वार्थाचा परीने जगतो. शहरातील सोसायट्यांभोवती, मोकळ्या जमिनीवर किंवा रस्त्याच्या कडेला अनेकदा कचऱ्याचे मोठे ढीग दिसतात. काही ठिकाणी लोक कसलीही काळजी न घेता थेट फ्लॅट किंवा इमारतींच्या बाल्कनीतून कचरा खाली फेकतात. इतर लोक देखील एकमेकांकडे पाहून त्या असभ्य वर्तनाची कॉपी करतात. लोक फक्त स्वतःची आणि घराची स्वच्छता ठेवतात पण, त्यांच्या वाईट वागण्याने समाजाचे किती नुकसान होते ह्या बद्दल कधीच विचार करीत नाही, हा त्यांच्या अशुद्ध विचारांचा दोष आहे. आपले घर, परिसर, गाव, शहर, राज्य, देश हे सर्व एक असून या सर्वांचा विचार करत स्वच्छतेचा संकल्प घेणे सर्वात महत्त्वाचे आहे.

समाजातील कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावायची असेल, तर त्यात लोकसहभाग खूप महत्त्वाचा आहे. लोकसहभाग तेंव्हाच साध्य होऊ शकतो, जेंव्हा लोक तयार होतील आणि आपली जबाबदारी समजून घेतील, त्यासाठी त्यांची मानसिकता बदलणे आवश्यक आहे. अर्थातच समाजाच्या शुद्धीकरण याबरोबरच लोकांचे विचारही शुद्ध झाले पाहिजेत, हा स्वच्छतेचा महत्त्वाचा भाग आहे. परोपकाराच्या भावनेने नि:स्वार्थीपणे कोणाची तरी मदत करणे, कोणाच्या दु:खात सहभागी होणे, रडणाऱ्या चेहऱ्यावर हसू आणणे, त्यातून मिळणारा आनंद आणि समाधान हे वेगळेच असते, जे आपण कुठूनही विकत घेऊ शकत नाही. बाह्य कचरा मानवी आरोग्यास आजार देतो, परंतु अंतर्गत मानवी कचरा मानसिक विकारांना जन्म देतो आणि त्याचे खूप गंभीर परिणाम होतात, एखाद्याच्या चुकीने संपूर्ण मानवी समाजावर परिणाम होतो. अशुद्ध विचारांमुळे शंका, स्वार्थ, अपराधीपणा, न्यूनगंड, लोभ, भेदभाव, घाणेरडे विचार, इतरांमध्ये दोष शोधणे, घमंड, अहंकार, भांडखोरपणा यांसारखे वाईट गोष्टी मानसिक विकार निर्माण करतात. द्वेष, राग, मत्सर, दुराचार हे माणसाला रानटी प्राण्यासारखे बनवतात. मन आणि मेंदूमध्ये पसरलेली घाण चुकीच्या कृत्यांना प्रोत्साहन देऊन समाजातील समस्या वाढवते, माणसाचे चारित्र्य आणि वागणूक हे त्याच्या विचारांचे फलित असते. आपल्या मनातून असा घाण अशुद्ध विचारांचा कचरा काढून टाकला तर आपोआपच समाजातील आपल्या कर्तव्याची जाणीव होऊन आणि आपण आपल्या चांगल्या वर्तनाने सामाजिक जबाबदाऱ्या पार पाडत समाजातील कचऱ्याची समस्या दूर करून मोठी कामगिरी करू शकू आणि सर्वत्र स्वच्छ, निरोगी वातावरण व आनंददायी विकास होईल.

**- डॉ. प्रितम गेडाम, नागपूर.**

टुडेज् ब्लॉग

# अदानी समूहावरील संकट

**अमेरिकी विश्लेषण संस्थेने घेतलेल्या आढाव्यानुसार अदानी समूहावरचे आर्थिक संकट गहिरे असल्याचे वृत्त येताच अदानी समूहाच्या शेअरमध्ये गुंतवणूक करणाऱ्यांवर एका दिवसात ४.२ लाख रुपये गमावण्याची पाळी आली.**

अदानी समूहाचे प्रमुख गौतम अदानी ही जगात सातव्या क्रमांकाची श्रीमंत व्यक्ती आहे. गेल्या दोन दिवसांपासून अदानी समूहाच्या शेअर्सची घसरण सुरू झाली असून ती रोखण्याचे आर्थिक बळ आज घडीला तरी अदानी समूहाकडे नाही. ह्या घसरणीला शेअर सटोडिया जितके कारणीभूत आहेत तितकेच खुद्द अदानी समूहाचे चालकही जबाबदारी आहे. मिळेल तसा आणि मिळेल तिथून पैसा उभा करण्याचे तंत्र कधी कधी अंगलट येते ते हे असे ! व्यावसायिक नफा मिळवण्यासाठी दुय्यम कंपन्या स्थापन करण्याचा सपाटा एखादा समूह लावत असेल तर त्यालाही मर्यादा आहेत. ह्या मर्यादांचे उल्लंघन वारंवार केल्यानंतर संकट मालिका अपरिहार्य ठरतेच. आत्ताच्या ह्या संकटातून तिकडम करून मार्ग काढला तर तो कोणाच्याही लक्षात येत नाही असे अदानी समूहाच्या अधिका-यांना वाटते. पण डोळे बंद करून मांजर दूध प्याली तरी इतरांचे डोळे बंद नसतात !

समूहातील कंपन्यांचा भांडवल उभारणीतला पोलखोल केली अमेरिकेतील हिंडेनबर्ग ह्या विश्लेषण कंपनीने. ह्या कंपनीविरुद्ध कारवाई करण्याची घोषणा गौतम अदानींनी केली असली तरी ह्या कंपनीचे विश्लेषक हे पाळीव मांजर नाहीत. हिंडेनबर्गला



अदानी समूहाने कितीही धमक्या दिल्या तरी हिंडेनबर्ग कंपनी बधणार नाहीच. गॅस, पेट्रोलियम, ऊर्जा ह्या क्षेत्रात रोख रक्कम जमा होते म्हणून त्या क्षेत्रातच जास्तीत जास्त गुंतवणूक कण्याचा सपाटा लावला. रेल्वेच्या खास गाड्या भाड्याने घेऊन त्या चालवण्याची गरज मोदी सरकारला पटवून देऊन अदानींनी तो रोखीचा धंदा सुरू केला. कांडला बंदराला लागून असलेली खारफुटीची जमीन गुजरात नरेंद्र मोदी सरकारकडून पदरात पाडून घेतली होती. त्या जमिनीत भराव टाकण्याचे कामही अदानींनी रेल्वेलाच करायला लावले. त्यांची वक्रदृष्टी विमानतळाकडे वळली. विमानतळाच्या व्यवस्थापनाचे कंत्राट मिळवून रोकड पैसा जमवला. पेट्रोलियम कंपन्यांची कमिशन एजन्सी मिळवून ती आणखी सोय केली. साहजिकच कंपनीला बँकांनी कॅश फ्लो'च्या पोटी मोठमोठी कर्जे दिली. त्याखेरीज कंपन्यांचे शेअर्स तारण ठेवून त्यावरही कर्ज दिले. हा सगळा बँकांच्या कर्ज पुरवठा धोरणाच्या नियमानुसार असला तरी अंतिमत: बँका आणि खुद्द अदानी समूह अडचणीत आल्याखेरीज राहणार नाही ह्याचे भान अदानी समूह आणि पतपुरवठा करणाऱ्यां-या बँका ह्या दोघांनाही राहिले नाही .

अंबानी आणि अदानी हे दोन्ही समूह स्वत:ला उद्योगपती समजत असले तरी दोघांना कॅश बिझनेस करण्यातच अधिक स्वारस्य आहे. सिलेक्शन परीक्षेत यशस्वी ठरलेले आयएएस अधिकारी कितीही शिकलेले असले तरी त्यांची अक्कल त्यांनी ह्या दोन्ही समूहाकडे गहाण ठेवली आहे. पढा बह्मन भुका अनपढा बनिया भुका' अशी ह्या दोन्ही समूहातील अधिकारी आणि त्यांच्याशी साटेलोटे करणाऱ्यां-या सरकारी अधिका-यांची अवस्था आहे. २०१४ सरकार सत्तेवर आल्यानंतर हे दोघे समूह सरकारमधील अधिका-यांना कल्पना सुचवतात. आणि पंतप्रधानांकडून मंजुरीही मिळवून आणतात !

२०२४ मध्ये लोकसभा निवडणुकीत विजय मिळेपर्यंत हे असेच सुरू राहील असे वाटते. म्हणू हर प्रकारे निवडणुका जिंकण्याचे डावपेच डावपेच सुरू झाले आहे. सर्व यंत्रणा त्या दृष्टीने कार्यरत आहे. अदानी समूहावरील संकट ही तर सुरुवात आहे! बेरोजगारी, लघुउद्योगांना कर्ज वगैरे विषय विसरून जाण्याचे दिवस आले आहेत हेच खरे !

**- रमेश झवर.**

जन्म हा अखेरचा

## भावाचारस्थल - १



अग्नीत अर्पण केल्याने वस्तूचे सामर्थ्य जणू काही वाढते. विद्युतशक्ती हे अग्नीचेच एक रुप आहे. तिच्यामुळेच आपला आवाज हजार, दहा हजार, लक्ष लोकांपर्यंत पोहोचू शकतो. रेडिओद्वारे, टीव्हीद्वारे ध्वनी आणि रुपदेखील कोट्यवधी लोकांपर्यंत पोहोचते. या व्यापकतेमागे विद्युतशक्ती आहे, हे मान्य करावे लागते. ती नसेल तर सर्व क्रिया ठप्प होते. त्याप्रमाणे अग्नीत जेंव्हा भगवंताला आवाहन करुन आपण काही अर्पण करतो तेंव्हा ते समष्टिरुप, सर्वव्यापक होते. कारण भगवंतच मुळात समष्टिरुप आहे. त्याला अर्पण केलेली वस्तू सर्वांनाच फळ देणारी ठरते. म्हणून शास्त्रात म्हटले आहे, 'यज्ञाद् भवति पर्जन्य पर्जन्याद अन्नसंभव:।'

प्राचीन काळी पाऊस पडावा म्हणून यज्ञ करीत असत. यज्ञामुळे पाऊस होई आणि पावसामुळे अन्न पिकत असे. आपल्याजवळ जे आहे ते भगवंताला देणे याचा अर्थ, त्यागभावनेची जोपासना करणे असा आहे. आज यज्ञप्रथा लुप्त झाली असली तरी क्वचित कुठे अजूनही यज्ञ होताना दिसतो. हा यज्ञ बाह्य होय. परंतु दुसरा यज्ञ आंतरिक यज्ञ आहे. आपल्या हृदयात जी आत्मरुप ज्ञानज्योत आहे. तिच्यात विषयांचे अर्पण करणे हाच आंतरिक यज्ञ होय. विषयांना ज्ञानाग्नीत का अर्पण करावे? शास्त्र सांगते की विषय हे विषरुप आहेत. विषयभोगी मनुष्याचा अंत:काल लवकर होतो. **(क्रमश:) – काशी जगद्‌गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

# शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबणार कशा?

जनमानस

शेतीमालाला रास्त भाव न मिळाल्यामुळे बरेचदा पिकांच्या बी बियाणांवर आणि खते खरिदण्यावर केलेला खर्च भरून येत नाही. अतिवृष्टी, अवकाळी पाऊस, ढगफुटी अशी संकटांची मालिका शेतकऱ्यांसमोर उभी राहणे हे आता नित्याचे झाले आहे. अशा परिस्थितीत कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडता येणे कठीण होत चालले आहे. खराब हवामान, सिंचन यामुळे कमी होत जाणारे शेती उत्पन्न, शेतकऱ्यांना शेतीपासून साधारण मोबदला मिळविणे देखील अशक्य होत आहे. कर्जफेड, पीक विम्याच्या थकबाकीसाठी तिष्ठत रहाण्याच्या काळाला मर्यादा राहिलेल्या नाहीत. ह्या सर्व संकटांना शेतकरीवर्गाला एकाकीपणे सामोरे जाण्याशिवाय शेतकऱ्यांना पर्याय उरत नाहीत. परिणामी हताश झालेल्या शेतकरी आत्महत्या हा पर्याय निवडतात. विष प्राशन करून, विहिरीत उडी घेऊन किंवा झाडाला गळफास लावून घेत शेतकरी आपले जीवन संपवितात.



शेतकऱ्यांच्या आत्महत्या ह्या विषयाबाबत राज्यकर्त्यांचे धोरण उदासीन राहिले आहे असा समज त्यामुळे जनसामान्यांच्यात निर्माण झाला आहे. शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्यांच्या संख्येवरून ते दिसून येते.

सन २०२१ मध्ये राज्यात २७४३ तर सन २०२२ मध्ये राज्यात २९४२ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या त्यावरून शेतकऱ्यांविषयी असणारी एकंदरीत उदासीनता स्पष्ट होते. राज्याच्या मदत व पुनर्वसन विभागाने संकलन केलेल्या आकडेवारीवरून राज्यात जेथे पिकांची सुपीकता नेहमी अधिक असते अशा अमरावती, औरंगाबाद जिल्ह्यांत अधिकतर शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची नोंद केली आहे. त्यापाठोपाठ नागपूर, नासिक व पुणे जिल्ह्यांतील आकडेवारी आहे.

शेतीमालाचे भाव, खतांचे दर जे प्रामुख्याने शेतकऱ्यांच्या नुकसानीस कारणीभूत ठरतात त्यावर शासनाने आपले अधिकार वापरून शेतकऱ्यांना दिलासा देणे शक्य आहे तसेच ते अपेक्षित आहे. निदान तेलंगणा राज्यासारख्या एकरी अनुदान देण्याचा निर्णय घेतल्यास चहूबाजूने भरडला जाणारा शेतकरी आत्महत्येपासून परावृत्त होऊ शकेल असे वाटते.

**- राजन पांजरी, जोगेश्वरी.**

# राजभवनाला कंटाळले...

**वयाची पंचाहत्तरी ओलांडलेल्या राजकीय नेत्यांना आणि विशेषत: माजी केंद्रीय मंत्री व माजी मुख्यमंत्र्यांना राजभवनाचे वेध लागतात. पण भगतसिंह कोश्यारी यांना अंगावर राज्यपालपदाची वस्त्रे असूनही, नको ते राजभवन, असे झाले आहे. कोश्यारी यांना मुंबईहून डेहराडूनला जाण्याची घाई झाली आहे. राजभवनात मन रमत नाही आणि राज्यपालपदाचे सुख मिळत नाही, अशी भावना त्यांनी व्यक्त केली आहे. अगोदर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना पत्र लिहून त्यांनी आपल्याला राज्यपालपदाच्या जबाबदारीतून मुक्त करावे, अशी विनंती केली होतीच. पण आता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ताज्या मुंबई भेटीतही त्यांना पत्र देऊन, आता पुरे झाले, मला उत्तराखंडमधील घरी जाऊन वाचन, मनन, चिंतनात निवांत जीवन व्यतीत करावेसे वाटते, असे सांगितले आहे.**

------------------------

महाराष्ट्र हे देशातील सर्वात संपन्न व प्रगत असे राज्य आहे. अनेक राज्यपालांनी महाराष्ट्रातील राजभवनची शान आणि प्रतिष्ठा वाढवली. मग कोश्यारी यांना राजभवनाचा कंटाळा का आला? राज्यातील विरोधी पक्षांना ते नकोसे झालेच. पण सत्ताधारी पक्षातील नेतेही त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहेत, असे चित्र कधी दिसले नाही. भगतसिंह कोश्यारी हे ऐंशी वर्षांचे आहेत. दि. ५ सप्टेंबर २०१९ रोजी त्यांनी महाराष्ट्राचे २२वे राज्यपाल म्हणून सूत्रे हाती घेतली. राजकारणात प्रवेश करण्यापूर्वी ते शिक्षक आणि पत्रकार होते.

कोश्यारी हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक. संघाच्या संस्काराच्या मुशीतूनच त्यांनी सार्वजनिक जीवनाला वाहून घेतले. भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष म्हणूनही त्यांनी जबाबदारी संभाळली. उत्तराखंड राज्याच्या निर्मितीनंतर भाजपचे पहिले प्रदेशाध्यक्ष म्हणून त्यांची पक्षाने नेमणूक केली होती. उत्तराखंड राज्याचे दुसरे मुख्यमंत्री म्हणून पक्षाने त्यांना मान दिला.

महाराष्ट्रात ऑक्टोबर २०१९ मध्ये विधानसभा निवडणुकीचे निकाल लागत असतानाच भाजप, शिवसेना, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या सरकार स्थापन करण्यासंबंधी हालचाली असतानाच अचानक पहाटे राजभवनात देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री व अजित पवार उपमुख्यमंत्री म्हणून शपथविधी पार पडला. या घटनेने साऱ्या महाराष्ट्राला धक्का बसला. विधानसभा निवडणुकीत युती कोणाची होती व कोश्यारी यांनी राजभवनात भल्या पहाटे शपथ कोणाला दिली? या घटनेने सारा महाराष्ट्र त्यावेळी आश्चर्यचकित झाला होता. राजकारणात काहीही होऊ शकते, हे त्याचे ते उदाहरण होते. कोश्यारी हे राज्यपाल झाल्यापासूनच वादाच्या भोवऱ्यात सापडले. त्यांनी ज्यांना शपथ दिली, दिली ते देवेंद्र फडणवीस-अजित पवार यांचे सरकार ७२ तासही टिकले नव्हते.



राज्यात उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली महाविकास आघाडीचे सरकार स्थापन झाल्यावर राज्यपाल व सरकार यांच्यातील संबंध ताणले गेले. मुख्यमंत्री व राज्यपाल ही दोन्ही घटनात्मक पदे आहेत. पण राज्यपालांविषयी जेवढा आदर ठेवायला हवा, तेवढा ठाकरे सरकारच्या काळात ठेवला गेला नाही आणि राज्यपालांवरच म्हणजे कोश्यारी हे भाजपचे एजंट म्हणून काम करतात, असा आरोप महाआघाडीने त्यांच्यावर केला.

सन २०२० च्या अगोदरपासूनच राज्य विधान परिषदेवर राज्यपाल नामनियुक्त १२ सदस्य नेमायला राज्यपाल संमती देत नाहीत, अशी तक्रार महाआघाडी सरकारची होती. दुसरीकडे विधान परिषदेवरील रिक्त झालेल्या ९ जागांवर निवडणूक घ्यावी, असे राज्यपाल कोश्यारी यांनी निवडणूक आयोगाला कळवले होते.

कोश्यारी यांना फेब्रुवारी २०२१ मध्ये प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकाऱ्यांच्या एका कार्यक्रमासाठी मसुरीला जायचे होते व त्यासाठी त्यांनी राज्य सरकारचे विमान मागितले होते. कोश्यारी यांना राज्य सरकारने आपले विमान वापरायला परवानगी दिली नाही. एवढेच नव्हे, तर त्यांच्यावर सरकारी विमानातून खाली उतरण्याची वेळ आली. त्यानंतर ते खासगी कंपनीच्या विमानाने मसुरीला रवाना झाले. महाआघाडी सरकारने त्यांना विमानाची परवानगी देण्याबाबत हात झटकले. या प्रकरणात मुख्यमंत्री कार्यालय व राजभवन यांच्यात संवाद नसल्याचे स्पष्ट झाले.

नोव्हेंबर २०२२ रोजी कोश्यारी यांनी महाराष्ट्राचे दैवत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांचा उल्लेख जुन्या काळातील आयकॉन असा केला, त्यावरून मोठा वाद पेटला. पूर्वी जेव्हा प्रश्न विचारला जायचा की, आपले आयकॉन (आदर्श) कोण आहेत, तेव्हा जवाहरलाल नेहरू, सुभाषचंद्र बोस, महात्मा गांधी अशी नावे घेतली जात असत. महाराष्ट्रात तर अनेक आयकॉन आहेत, त्यासाठी अन्यत्र कुठे बघायचीही गरज नाही. इथे छत्रपती शिवाजी महाराज जुन्या काळात आयकॉन होते, आजच्या काळात आंबेडकर, नितीन गडकरी आहेत. जुलै २०२२ मध्ये मुंबई-ठाण्याच्या अस्मितेला धक्का लागेल, असे त्यांच्याकडून विधान केले गेले. जर गुजराती व राजस्थानी यांना महाराष्ट्रातून विशेषकरून मुंबई-ठाण्यातून दूर केले, तर (इथे) पैसाच राहणार नाही आणि मुंबई ही आर्थिक राजधानीही राहू शकणार नाही. नंतर कोश्यारींनी खुलासा करताना म्हटले, माझ्या वक्तव्याचा विपर्यास केला गेला. मराठी लोकांचे योगदान कमी आहे, असे सांगण्याचा माझा मुळीच हेतू नव्हता. एका समाजाची प्रशंसा केली म्हणजे दुसऱ्या समाजाचा अपमान केला, असा त्याचा अर्थ काढणे योग्य नाही. मार्च २०२२ मध्ये महात्मा जोतिराव फुले व सावित्रीबाई फुले यांच्याविषयी बोलताना त्यांनी आणखी एक वाद ओढवून घेतला.

खरे तर कोश्यारी बालविवाहाच्या मुद्यावर आपली भूमिका मांडत होते. पण त्यांच्या वक्तव्यातून असंतोषाचा भडका उडाला. विवाहाच्या वेळी सावित्रीबाईंचे वय १० होते व पतीचे वय १३ होते, या वयात त्यांचे विचार काय असू शकतील? असे बोलून त्यांनी मराठी जनतेच्या श्रद्धास्थानालाच धक्का लावला. विधान परिषदेच्या राज्यपाल नामनियुक्त १२ जागा अडीच वर्षे रिक्त राहिल्या. न्यायालयाने समज दिल्यानंतरही राजभवनवरून कोणतीही हालचाल झाली नाही. ठाकरे सरकारच्या काळात विधान परिषदेवर १२ जागा भरण्यासाठी राज्यपालांकडे नावांची शिफारस केली होती. पण शिंदे-फडणवीस सरकार आल्यानंतरही त्या जागा रिकाम्याच राहिल्या. अर्थात त्या रिक्त जागांच्या टीकेचे धनी कोश्यारी यांनाच व्हावे लागले.

कोश्यारी यांची राज्यपालपदाची कारकिर्द त्यांनाही सुखावह ठरली नाही. कोश्यारी हटाव मागणीसाठी राज्यात ठिकठिकाणी आंदोलने झाली, त्यांच्या प्रतिमा जाळल्या, त्यांच्या प्रतिमेला जोडे मारण्यात आले, असे कोणत्याही राज्यपालांच्या बाबतीत पूर्वी असे घडले नव्हते. म्हणूनच मलाच मुंबईच्या राजभवनाच्या (जोखडातून) मुक्त करा, अशी त्यांनी पंतप्रधान व केंद्रीय गृहमंत्र्यांकडे केलेली मागणी त्यांच्या दृष्टीने योग्यच आहे. प्रजासत्ताक दिनाला त्यांच्या हस्ते झेंडावंदन झाले, पण देवभूमीतून आलेल्या भगतसिंह कोश्यारी यांना संतभूमी मानवली नाही, असेच म्हणावे लागेल.

**- डॉ. सुकृत खांडेकर.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# मोबाईल चोरणाऱ्या सराईत गुन्हेगारांना अटक



## दादाई संस्था व राजे प्रतिष्ठानतर्फे प्रजासत्ताक दिन साजरा

**सुराज्य/सोलापूर :** दादाई बहुउद्देशीय समाजसेवी संस्था व राजे प्रतिष्ठानच्यावतीने ७४ वा प्रजासत्ताक दिन सेटलमेंट फ्री कॉलनी नंबर १ जुना वांगी रोड येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. टकारी समाजातील जेष्ठ महादेव जाधव यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन संस्थापक अध्यक्ष युवराज जाधव यांनी केले होते. यावेळी संस्थेचे आधारस्तंभ नारायण जाधव, टकारी समाज विकास विचार मंचचे शहर अध्यक्ष गैबू जाधव, जिल्हाध्यक्ष राजेंद्र जाधव, सेक्रेटरी रवींद्र गायकवाड, टकारी समाज सुधारक मंडळाचे अध्यक्ष निशांत गायकवाड, प्रकाश गायकवाड, युवक अध्यक्ष विनोद जाधव, पवन गायकवाड, चंद्रकांत गायकवाड, बालाजी जाधव, किसन जाधव, सुरेश गायकवाड, पिरप्पा जाधव, लिंगप्पा गिरणीवड्डर, दीपक जाधव, अविनाश जाधव, सायबू गायकवाड, भीमाशंकर गायकवाड, संस्थेचे सल्लागार भारत गायकवाड, श्रीकांत जाधव, संतोष गायकवाड, चंद्रकांत हौसनूर, विष्णू गायकवाड, राघवेंद्र जाधव, दिनेश गायकवाड, सागर गायकवाड, गणेश जाधव, आकाश गायकवाड आदींसह परिसरातील नागरिक उपस्थित होते.

## जि. प. प्राथ. केंद्र शाळा चांदापुरीचे स्नेहसंमेलन उत्साहात

**सुराज्य/पिलीव :** जि. प. प्राथ. केंद्र शाळा चांदापुरीचे स्नेहसमेलन मोठ्या उत्साहात संपन्न झाले. चांदापुरीचे नुतन सरपंच जयवंत सुळ, उपसरपंच तात्यासो चोरमले, युवा नेते विजयसिंह पाटील व विविध मान्यवरांच्या हस्ते फीत कापून व माता सरस्वती यांच्या प्रतिमेचे पूजन करुन दीपप्रज्वलन आणि रंगमंचाचे पूजन करण्यात आले. शाळेतील बालचमूंनी विविध कलागुण यामध्ये शेतकरी नृत्य, लावणी नृत्य, देशभक्तीपर गीते, भक्तीगीते, विनोदी नाटक असे विविध कलाविष्कार सादर करुन प्रेक्षकांची वाहवा मिळवली. यावेळी केंद्रप्रमुख राजू गोरवे, सत्यजित बनकर, बापूसाहेब चंदनशिवे, नूतन ग्रामपंचायत सदस्या सविता पाटील, प्रियांका सरक, दिपाली निकम, नूतन सदस्य अजित लोखंडे, आप्पा शिंदे, हनुमंत सरतापे, माजी सरपंच भजनदास चोरमले, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संजय कोपनर उपाध्यक्ष संतोष सरक, दिपक कोपनर, युवानेते शाहिद शेख, विकास कोळपे, आप्पा पाटील, शिवाजी पाटील, अनिल मगर, शिवाजी गोरवे, बापू लोखंडे, बाबा पुकळे, बाळू पाटोळे, प्रकाश शिंदे, प्रदीप लाडे, तालुक्याच्या कानाकोपऱ्यातील शिक्षकवर्ग, पत्रकार अभि तावरे, दामोदर लोखंडे, संजय पाटील, रशिद शेख आदी मान्यवर ग्रामस्थ महिलावर्ग बहुसंख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन राजू गोरवे, तर आभारप्रदर्शन सत्यजित बनकर यांनी मानले.

**सुराज्य/सोलापूर**

**शहरात मागील दोन ते तीन महिन्यात जेलरोड, विजापूर नाका, सदर बझार, फौजदार चावडी, जोडभावी पेठ या पोलीस ठाण्याच्या हद्दीत रात्रीच्या वेळी पायी चालत जाणाऱ्या नागरिकांच्या हातातील मोबाईल जबरीने हिसकावण्याचे सात ते आठ प्रकार घडले होते. या घटनेबाबत संबंधित पोलीस ठाण्यात जबरी चोरीचे गुन्हे देखील दाखल करण्यात आले होते. त्या अनुषंगाने पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन तेथील तांत्रिक विश्लेषणातून मिळालेली माहिती व सीसीटीव्ही फुटेज याद्वारे त्यांनी बारकाईने अभ्यास करून दोघांना ताब्यात घेऊन पाच लाख छत्तीस हजार पाचशे दहा रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.**




सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांना एका बातमीदारामार्फत शहरात मागील दोन-तीन महिन्यांमध्ये चोरी झालेले मोबाईल विक्री करण्यासाठी दोन इसम लाल रंगाच्या टीव्हीएस अपाचे मोटरसायकल क्रमांक.एम.एच.२५.ए.पी.१२५६ यावरून रेवणसिद्धेश्वर मंदिर जवळ जुना विजापूर नाका येथे येणार आहे.अशी बातमी मिळाली.

यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप पाटील व त्यांच्या पथकाने सापळा लावून संशयित इसम जुबेर नासिर शेख (वय-२७, व्यवसाय मजुरी, रा. पीसीएमसी कॉलनी निगडी पुणे, सध्या- शबाना शेख यांच्या घरात भाड्याने, देसाई नगर, नई जिंदगी) व इम्रान अफसर फुलारी (वय-२२, रा. महादेव मंदिराच्या मागे, वडापूर, तालुका दक्षिण सोलापूर) या दोघांना ताब्यात घेतले. त्यावेळी त्यांची झडती घेतली असता, झडतीमध्ये एकूण १८ विविध कंपनीचे मोबाईल फोन मिळून आले. दोन्ही इसमाकडून मिळालेल्या मोबाईल हँडसेटची पाहणी केली असता, मोबाईल फोन बाबत सहा जबरी चोरीचे व एक चोरीचा गुन्हा असे एकूण सात गुन्हे दाखल असून ते उघडकीस आलेले आहेत. दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून,आरोपींना अटक करण्यात आली आहे.

ही कामगिरी पोलीस आयुक्त राजेंद्र माने, पोलीस उपायुक्त दिपाली काळे, सहाय्यक पोलीस आयुक्त प्रांजली सोनवणे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील दोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप पाटील व त्यांच्या पथकातील पोलीस अंमलदार श्रीकांत पवार, संदीप जावळे, विजयकुमार वाळके, राहुल तोगे, विद्यासागर मोहिते, गणेश शिंदे, तात्यासाहेब पाटील, वसीम शेख, प्रकाश गायकवाड व चालक सतीश काटे, बाळू काळे यांनी पार पाडली.

### जबरी चोरीचे सात गुन्हे उघडकीस

सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप पाटील व त्यांच्या पथकाने कौशल्यपूर्ण तपास करून आरोपींकडून मोबाईल फोन, गुन्ह्यात वापरण्यात आलेली टीव्हीएस अपाचे कंपनीची मोटरसायकल असा एकूण पाच लाख छत्तीस हजार पाचशे दहा रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करून, जबरी चोरीचे गंभीर स्वरूपाचे सात गुन्हे उघडकीस आणले आहेत.



## डोणगाव येथे हळदी कुंकू व तिळगूळ वाटपचा कार्यक्रम

**सुराज्य/डोणगाव**

डोणगाव येथे शैक्षणिक, सामाजिक, राजकीय व विविध क्षेत्रातील बहुसंख्य महिलांनी एकत्र येऊन विचारांची देवाणघेवाण करत हळदी कुंकू व तिळगुळ वाटपाचा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी जयश्री माने यांच्या हस्ते उपस्थित महिलांना हळदी कुंकू व तिळगुळ व वाण म्हणून स्टील ताट देण्यात आले.

या हळदी कुंकू समारंभात ४०० महिला उपस्थित होत्या. डोणगाव भाटेवाडी ग्रामपंचायत उपसरपंच अश्विनी सुरवसे यांच्या हस्ते जयश्री माने यांचा सत्कार करण्यात आला. सामाजिक कार्यकर्त्या लता जावीर, शुभांगी गायकवाड, माजी ग्रामपंचायत सदस्या उज्वला मेटे, नूतन सदस्या मनिषा अवताडे, गौरी अवताडे, मोहिनी शिंगाडे, आरती गायकवाड, सुरेखा वाघमारे, किर्ती चराटे, अश्विनी चराटे, वैभवलक्ष्मी बचतगटच्या अध्यक्षा राणी दगडे या सर्वांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम व उत्साहात संपन्न झाला.

सूत्रसंचालन ऋतुजा अवताडे यांनी केले तर गौरी अवताडे यांनी आभार प्रदर्शन केले.

## रेवणसिद्ध नगरात घरफोडी; रोखरकमेसह चांदीचे दागिने लंपास

**सोलापूर :** बंद घराच्या दरवाजाची कडी-कोंडा व कुलूप कशाने तरी तोडून अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश करत घरातील रोख रक्कम,चांदीचे दागिने व महागड्या किमतीच्या घड्याळी असा २७ हजार ६०० रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची घटना दि. २८ रोजी दुपारच्या सत्रात रेवणसिद्ध नगर विजय देशमुख नगरच्या बाजूला विजापूर रोड येथे घडली. याप्रकरणी पृथ्वीराज रेवनसिद्धप्पा साखरे (वय-७३, रा. रेवणसिद्ध नगर) यांनी विजापूर नाका पोलीस ठाणे फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचा तपास पोसई मुरकुटे हे करीत आहेत.

## इलेक्ट्रो प्रदर्शनाचा आज शेवटचा दिवस

**सोलापूर :** एक्सिबिशन ग्राऊंड, इंद्रधुनजवळ सुरु असलेल्या इलेक्ट्रॉनिक्स, होम प्लायन्सेस,कॉम्प्युटर, टेलिकम्युनिकेशन, सोलार उत्पादन व फिटनेस इक्विपमेंटसचे प्रदर्शन इलेक्ट्रो २०२३ आज शेवटचा दिवस आहे.

दुपारी ४. ते रा. ९.३० पर्यंत असल्याची माहिती अध्यक्ष ईश्वर मालू यांनी दिली आहे. तरी ग्राहकांनी याचा अधिकाधिक फायदा घ्यावा. मेटझ् हे मुख्य प्रायोजक असून केल्वहीनेटर, सिस्का व बीपीएल् हे सह प्रायोजक आहेत. इलेक्ट्रो २०२३ या प्रदर्शनाचे हे २३ वे वर्ष असून सोलापूरच्या नव्याने निर्मित स्मार्ट सिटी मैदानावर हे हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. यंदा उभारण्यात आलेल्या वातानुकुलीत टेन्ट सोलापूरकरांचे आकर्षण ठरले आहे. अशाप्रकारचे नियोजन व व्यवस्थापनासाठी सेडाचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. ३५० स्टॉलधारक असलेल्या या प्रदर्शनात भेट देणाऱ्यांसाठी दररोज लकी ड्रॉद्वारे विविध भेट वस्तु देण्यात येत असून आज शेवटच्या दिवशी बंपर ड्रॉ द्वारे भेट देण्यात येणार असल्याची माहिती इलेक्ट्रोचे चेअरमन शिवप्रकाश चव्हाण यांनी दिली. आज सोमवारी रात्री ९. वाजता सांगता कार्यक्रम होणार असून ह्यामध्ये सर्वोत्कृष्ट स्टॉलचे विविध पारितोषिक देण्यात येणार आहेत.



**सुराज्य/सोलापूर**

## भाऊसाहेब महाराज पालखी सोहळ्याची उत्तरपूजा

सद्गुरू भाऊसाहेब महाराज उमदीकर यांच्या पायी दिंडी पालखी सोहळ्याची उत्तरपूजा रविवारी बुधलेगल्लीतील मठात भक्तीभावाने पार पडली. श्रीक्षेत्र इंचगिरी येथील पुण्यतिथीचा सोहळा आटोपून परत आल्यानंतर परंपरेनुसार ही उत्तरपूजा भाऊसाहेब महाराज मठात होत असते.

दुपारी बारा वाजता श्रीदासबोध वाचन करण्यात आले. आचेगावचे साधक नानासाहेब खोबण यांनी त्यातील काही ओव्यांचे वाचन केले. त्यावर पेनूरचे डॉ. स्वामी, सुनील कुंदूर, श्रीशैल अक्कलकोटे, धर्मे महाराज, कुंभारीचे राम महाराज यांनी निरूपण केले. त्यानंतर भाऊसाहेब महाराज आणि श्रीसिद्धरामेश्वर महाराज यांच्या पादुकांवर पुष्पवृष्टी करण्यात आली. महाआरती झाल्यानंतर भक्तांना महाप्रसाद देण्यात आला. याप्रसंगी पालखी सोहळ्याचे सदानंद करजगी व यशवंत कोले यांच्यासह भक्तगण उपस्थित होते.

बुधले गल्लीतील मठात बारामहिने नामस्मरण व आरतीचा कार्यक्रम होत असतो. स्वातंत्र्यपूर्व काळापासून ही पालखी सेवा सुरू आहे. पौष अमावस्येला श्रीक्षेत्र इंचगिरी येथे भाऊसाहेब महाराज व त्यांचे शिष्य गिरमल्लेश्वर महाराज यांच्या पुण्यतिथीचा सोहळा होत असतो. त्यात सहभागी होण्यासाठी बुधलेगल्लीतील मठातून भाऊसाहेब महाराज यांची पालखी पाथरी, कंदलगाव, विंचूर, भंडारकवठे, उम्रज, चडचण, देवनिंबर्गी असा पायी प्रवास करून इंचगिरीला जात असते. त्यानंतर त्याच मार्गाने ही पालखी सोलापूरला पायी येत असते. इंचगिरी संप्रदायाचा महिमा सोलापुरातही आहे.

## सरकारकडून लिंगायत समाजाच्या मागण्या मान्य करून घेऊ : आ. कोरे




**सुराज्य/सोलापूर**

**आझाद मैदान येथे लिंगायत महामोर्चा संख्येने मोठ्या उत्साहात पार पडला. सरकारच्यावतीने आ. विनय कोरे यांनी निवेदन स्विकारून समाजबांधवाच्या मागण्या सरकारकडून मान्य करून घेण्याचे आश्वासन त्यांनी मोर्चास दिले.**

लिंगायत समाजाच्या विविध मागण्यासाठी मुंबईत मोर्चा काढला आझाद मैदानावर मोर्चा विराट जाहीर सभेमध्ये रूपांतर झाले. यासभेत लिंगायत समाजाला भाषिक अल्पसंख्यांक म्हणून नवीन विद्यापीठ देणार द्यावे लिंगायत समाजाकडून स्थापन करणाऱ्या संस्थांना अल्पभाषिक संस्था म्हणून सरकारचे सर्व अनुदानित उपलब्ध करून द्यावे. विधानसभेमध्ये जागेचे सर्वे करून महात्मा बसवेश्वराचा पूर्णकृती पुतळाची स्थापना करणाराव, विधानसभेच्या आत महात्मा बसवेश्वर यांचे संपूर्ण तैलचित्र साकारावे. समाजासाठी महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळ याची स्थापना करून कर्जाची उपलब्धता द्यावी.

मंगळवेढा येथे महात्मा बसवेश्वरांच्या स्मारकासाठी जागा व बसवसृष्टी लवकर साकारण्यात यावी, लिंगायतला संविधानिक स्वतंत्र धर्माचा दर्जासाठी एक अभ्यास गटाची स्थापना करून त्याच्या पूर्ण अभ्यास करून सरकारला अहवाल सादर करणार करावा अशा मागण्या यावेळी करण्यात आल्या. यावेळी ८० टक्के मागण्या मान्य असल्याने इतर मागण्याबाबत सरकार साकारात्मक असल्याचे सांगण्यात आले.

या मोर्चामध्ये अ. भा. लिंगायत समन्वय समिती लिंगायत धर्म महासभा, महाराष्ट्र वीरशैव महासभा, राष्ट्रीय बसवदल, जागतिक लिंगायत धर्मसभा, बसव ब्रिगेड ते विविध संघटनेने भाग घेतला तर जगद्गुरु चेन्नई बसवानंद महास्वामीजी , आमदार विनय कोरे लिंगायत समन्वय समितीचे राष्ट्रीय निमंत्रक अविनाश भोसीकर, राज्य महासचिव विजयकुमार हत्तुरे माधवराव टाकळीकर, सुधीर सिंहासने, प्रदीप बुरांडे, वीरेंद्र मंगलगे, कीर्तीकुमार बुरांडे, रामदास देशिंगे, बी. एस. पाटील आदींसह मान्यवर उपस्थित होते.

## मृत्यूस कारणीभूत; एकावर गुन्हा

**सुराज्य/सोलापूर :** मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी एका जणाविरुद्ध विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना दि.२५ रोजी रात्री ७ वा. च्या सुमारास अत्तार नगर येथील कोयला हॉटेलच्या समोर घडली.

याप्रकरणी विजयकुमार इराप्पा विजापुरे (वय-५२, रा. सिंधू विहार, जुळे सोलापूर) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून आकाश पिराजी सलगर (रा. उद्धव नगर भाग-२ सैफुल, सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. सोमनाथ नागनाथ पाटील (वय-३७,रा. मु. पो. निंबर्गी, ता. द. सोलापूर, सध्या-रा. जयकुमार नगर, माशाळ वस्तीजवळ) हे रस्ता ओलांडण्यासाठी दुचाकी क्रमांक एम.एच.१३.सीएच.२८६३ या दुचाकीवरून रस्त्याच्या बाजूला थांबले होते. त्यावेळी सैफुलकडून कंबर तलावकडे जाणारी दुचाकी बजाज अवेंजर क्र. एम.एच.१३. डीएक्स. ७०५१ यावरील चालकाने भरधाव वेगात चालवून सोमनाथ पाटील यांना जोरात धडक देऊन गंभीररित्या दुखापत करून त्यांच्या मृत्यूस कारणीभूत झाला आहे. घटनेचा तपास पोसई मुलाणी करीत आहेत.





## युवराज मंडले यांचा गरुड बंगला येथे सत्कार

**वेळापूर** : वेळापूर गावचे महात्मा गांधी तंटामुक्ती समितीचे अध्यक्षपदी युवराजमंडले यांची निवड झाल्याबद्दल युवराज मंडले यांचा गरुड बंगला येथे राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्ह्याचे नेते उत्तमराव जानकर यांच्या वतीने सन्मान करण्यात आला. यावेळी वेळापूर ग्रामपंचायतीचे गटनेते संजयआबा मंडले, लखन तात्या मंडले, संदीपतात्या माने देशमुख, शंकर आडत, जवान माने देशमुख, विनायकबाबा चंदनशिव,शिवसेना शहर प्रमुख आप्पासाहेब कांबळे, सामाजिक कार्यामध्ये अग्रेसर असणारे अमोल पानसे, रामा शेंडगे आदी उपस्थित होते.

## अक्कलकोट रयत क्रांती संघटनेच्या नूतन पदाधिकाऱ्यांची निवड

**अक्कलकोट** : अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातील रयत क्रांती संघटनेच्या नूतन पदाधिकाऱ्यांची निवड दिनांक २५ जानेवारी रोजी करण्यात आले. या निवडी संदर्भात अक्कलकोट येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. सदरची निवड ही रयत क्रांती संघटनेचे तालुकाध्यक्ष नागेश नायकोडी, महिला आघाडी तालुकाध्यक्ष प्रियांका दोड्याळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. याप्रसंगी रयत क्रांती संघटनेचे पश्चिम महाराष्ट्र कार्याध्यक्ष हनुमंत गिरी, जिल्हाध्यक्ष नामदेव पवार, जिल्हा कार्याध्यक्ष बाबा ननवरे, जिल्हा उपाध्यक्ष बाळासाहेब बोबडे, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष तनुजा जावळे आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी अक्कलकोट तालुका संपर्कप्रमुख पदी राजू पाटील (अंकलगी), युवक तालुकाध्यक्षपदी सरपंच प्रकाश बिराजदार (हालहळ्ळी) तालुका सरचिटणीस पदी शरणबसप्पा साबणे (अंकलगी), विधानसभा तालुका महिला आघाडी उपाध्यक्ष सोनाली अलमपुरे (कुंभारी), महिला आघाडी सरचिटणीस श्रीदेवी रेड्डी (कुंभारी), महिला आघाडी सरचिटणीस रेणुका मोरे (शावळ), ओबीसी आघाडी तालुकाध्यक्ष राजकुमार कोळी, तालुका कार्याध्यक्ष रमेश भंगे, दक्षिण सोलापूर संपर्कप्रमुख लक्ष्मण बिराजदार, दक्षिण सोलापूर महिला युवा अध्यक्ष राणी होटकर, दक्षिण सोलापूर महिला अध्यक्ष वैष्णवी लोहार आदींची निवड करून सर्व नूतन पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. कार्यक्रमास तालुका उपाध्यक्ष गोपाळ कुंभार, मल्लिकार्जुन डबरे (करजगी), बसवराज अदाणे, शिवानंद सलगर, रहीम हागलदिवटे आदींस शेतकरी बांधव उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक तालुकाध्यक्ष नागेश नायकोडी यांनी केले. सूत्रसंचालन लक्ष्मण बिराजदार यांनी केले तर आभार मल्लिकार्जुन डबरे यांनी मानले.

## शिवरत्न टॅलेंट सर्च परीक्षेला उत्स्फूर्त प्रतिसाद


**अकलूज** : शिवरत्न शिक्षण संस्था संचलित शंकरराव मोहिते पाटील इंग्लिश स्कूल अँड ज्युनियर कॉलेज (शिवरत्न पॅटर्न)च्या वतीने इ.१० वी मधील विद्यार्थ्यांसाठी शिवरत्न टॅलेंट सर्च परीक्षा रविवार ता.२९ रोजी घेण्यात आली यामध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. ३८७ विद्यार्थी या परीक्षेत सहभागी झाले होते. टॅलेंट सर्च परीक्षेच्या आधी विद्यार्थ्यांना करिअरपर मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमासाठी शिवरत्न शिक्षण संस्थेच्या अध्यक्ष शीतलदेवी मोहिते पाटील, सचिव धर्मराज दगडे, संचालक डॉक्टर विश्वनाथ आवड, प्रशांत जगताप, श्रीकांत राऊत व अल्बर्ट थरकन इतर मान्यवर उपस्थित होते. या परीक्षेत प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यास १०,०००/- रुपये, द्वितीय क्रमांकास ७०००/- रुपये, तृतीय क्रमांकास ५०००/- रुपये तर उत्तेजनार्थ पाच विद्यार्थ्यांना प्रत्येकी १०००/- रुपये व प्रमाणपत्र तसेच सहभागी सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रोहित देशमुख यांनी केले तर प्रस्तावना राजकिरण माने देशमुख व आभार प्रदर्शन स्वप्निता कळसुले यांनी केले.



## उज्वलाताई शिंदे विद्यामंदिरात क्रीडा महोत्सव साजरा

**उत्तर सोलापूर** : उत्तर सोलापूर सलगरवाडी डोनगावरोड येथील उज्वलाताई सुशिलकुमार शिंदे प्राथमिक विदमामंदीरात आंतरशालेय क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन मुख्याध्यापक जयवंत हक्के यांच्या अध्यक्षतेखाली प्रभागाच्या नगरसेविका माजी सुनिता रोटे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सामाजिक कार्यकते डॉ. दादाराव रोटे, पवन कारंडे,नागनाथ शिंदे, राहुल चव्हाण, श्रीराम खरात, शैला शिंदे, सविता स्वामी, निकिता जाधव, सुर्वणा चोरमुले यांच्यासह शिक्षक, शिक्षिका व विदयार्थी उपस्थित होते.

## रकमा ग्रामीण कथा संग्रहाचे ४ फेब्रुवारी रोजी प्रकाशन




**सोलापूर** : संध्या सूर्यकांत धर्मधिकारी लिखित व महाराष्ट्रराज्य साहित्य अणि संस्कृती मंडळ अनुदानित रकमा या ग्रामीण कथा संग्रहाचे प्रकाशन शनिवारी दि ४ फेब्रवारी रोजी ४ वाजता हॉटेल ध्रुवयेथील नंदनवन हॉल येथे होणार असल्याची माहिती श्रीया पंडित यांनी दिली. हा प्रकाशन सोहळा ज्येष्ठ साहित्यिक समीक्षक व अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या शुभहस्ते होणार आसून जेष्ठ वक्ते दलित कथाकार योगीराज वाघमारे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे सहायक कुलसचिव डॉ. शिवाजी शिंदे तसेच सहायक प्राध्यापक डॉ. दत्तात्रय घोलप यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये होणार आहे. यावेळी मसापच्या सोलापूर अध्यक्ष श्रुतीश्री वडकबाळक, कवी आबासाहेब पाटील, लेखक हरीशचंद्र पाटील, कवी मारुती कटकधोंड, व लेखक राजेंद्र भोसले उपस्थित राहणार आहेत तरी या कार्यक्रमास सोलापूरातील साहित्यिकांना उपस्थित राहावे असे आवाहन संयोजकांनी केलें आहे.

# कुरुल येथे माघवरीतील दुसरे गोल रिंगण सोहळा

**सुराज्य/विरवडे (बु)**



माघवरी निमित्त सोलापूर ते पंढरपूर पायी चालत जाण्याची परंपरा खूप मोठी असून निष्ठेने सांभाळली आहे. हा पालखी सोहळा तीऱ्हे मार्गे कामती कुरुल मार्गे श्री क्षेत्र पंढरपूरला पायी चालत जात असतो. नामाच्या गजरात वारकरी भाविक उत्साहात चालत जातात. या सोहळ्यातील दुसरे भव्य गोल रिंगण पाटकर वस्ती, कुरुल ता. मोहोळ येथे रविवारी सकाळी नऊ वाजता पार पडला.


रिंगण सोहळा सुरु करून १२ वे वर्ष असल्यामुळे तप:पूर्ती वर्ष साजरे करण्यात आले आहे, १२ वर्षांपासून ही परंपरा चालू आहे या रिंगण सोहळ्याचा यजमान मान कुरुल गावाला मिळाला आहे अन तो कुरुल ग्रामस्थांनी टिकविली हि आहे - पुढील पिढीला प्रेरणादायी कार्य व आदर्श निर्माण केल्यामुळे अखिल भाविक वारकरी मंडळ पालखी सोहळा समिती अध्यक्ष शंकर भोसले , सचिन गायकवाड (शहर उपाध्यक्ष), यांच्या कडून कुरुल ग्रामस्थांचा सन्मान करण्यात आला आहे. तसेच रमेश शिंदे, पांडूरंग जगताप, महेश चव्हाण (विभागीय अध्यक्ष) या मान्यवरांच्या हस्ते पालखी पूजन करण्यात आले असून कुमार गायकवाड (जिल्हा सचिव), दगडू डोंगरे (विभागीय उपाध्यक्ष), मा. पंचायत समिती सदस्य जालिंदर भाऊ लांडे ,चेअरमन चंद्रशेखर बापू जाधव. पदाधिकारी यांचे हस्ते रिंगणातील मानाच्या आश्वचे पूजन करण्यात आले आहे. सर्व दिंडी प्रमुख - विणेकरी यांचा सत्कार करून रिंगण सोहळा सुरु करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात पालखी पूजन, विना पूजन, अश्वपूजन व तुळशी पूजन ध्वजाधारी रिंगण सुरू झाले आणि वातावरण भक्तिमय झाले.

**जन्मासी येऊनी पहावी पंढरी**

या उक्तीचा प्रत्यय येऊ लागला नंतर महिला भाविकांचे रिंगण सुरू झाले. महिलांचा सहभाग वाखाणण्या जोगा होता. नंतर मृदंग व विणेकरी रिंगण उत्साहात पूर्ण झाले आणि शेवटी अश्व रिंगण सुरू झाले. उपस्थित भाविक वारकरी स्वत: ला विसरून समरस झाल्याचा अनुभव येत होता. तो आनंद घेऊन सर्व भाविकांनी पंढरपूर कडे वाटचाल सुरु केली. कुरुल पंचक्रोशितील भाविकांच्या उपस्थितीत हा सोहळा संपन्न झाला. दिंडीतील भाविकांना व प्रमुखांना पायी चालत असताना अपघात होऊ नये म्हणून काळजी घ्यावी असे आवाहन अखिल भाविक वारकरी मंडळ यांचे वतीने ह भ प सुधाकर महाराज इंगळे (राष्ट्रीय अध्यक्ष) यांचे कडून करण्यात आले. या रिंगण सोहळ्यासाठी जोतीराम चांगभले (प्रदेश अध्यक्ष), बळिराम जांभळे (राष्ट्रीय सचिव), बंडोपंत कुलकर्णी (जिल्हा अध्यक्ष), संजय पवार (शहर अध्यक्ष), गोरख शिंदे आदी पदाधिकारी व कुरुल परिसरातील ग्रामस्थ व वारकरी मोठ्या संख्येने उपस्तित होते.

# आरोग्य केंद्रातील उणीव भरून काढण्याची भूमिका : पाटील

**सुराज्य/नातेपुते**



शासनाच्या योजना गोरगरीब जनतेपर्यंत पोहोचवण्याचे काम अधिकाऱ्यांचे असते अधिकाऱ्यांनी ते काम प्रामाणिकपणे केल्यास चांगला संकल्प पूर्ण झाल्याचा पहावयास मिळेल ८० टक्के समाजकारण २० टक्के राजकारण या उक्तीप्रमाणे बाळासाहेबांनी कार्यकर्ते घडवले.

त्यामुळे आज महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे , राज्याचे आरोग्य मंत्री तानाजीराव सावंत व जिल्ह्याचे नेते शिवाजीराव सावंत यांच्या माध्यमातून आपल्या तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रात जी उणीव भासेल ती भरून काढण्याची भूमिका माझी असेल असे मत माळशिरस तालुका शिवसेनाप्रमुख राजकुमार हिवरकर पाटील यांनी व्यक्त केले. ते फोंडशिरस तालुका माळशिरस येथे माता सुरक्षित तर घर सुरक्षित या अभियानाच्या दुसऱ्या टप्प्याच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. सदर अभियानाच्या कार्यक्रमाचे उद्घाटन बाळासाहेबांची शिवसेना तालुकाप्रमुख राजकुमार हिवरकर पाटील यांच्या शुभहस्ते घेण्यात आले. यावेळी नातेपुते उपप्रमुख पोपट शिंदे, तसेच दादा मुलानी, सोनू लांडगे, फोंडशिरस ग्रामपंचायत सरपंच पोपट बोराटे डॉ.एस.के. जाधव उपस्थित होते. या घेण्यात आलेल्या दुसऱ्या टप्प्याच्या अभियानामध्ये १ ते १८ वर्ष वयोगटातील मुला मुलींची आरोग्य तपासणी, बेटी बचाव बेटी पढाव, गरोदर माता मेळावा व ढवळ जेवणाचा कार्यक्रम, क्षयरोग असणाऱ्या रुग्णांना रक्त वाढीच्या गोळ्याचे वाटप करण्यात आले, गरोदर मातांना सकस आहाराचे वाटप करण्यात आले, साथीच्या रोगाविषयी माहिती सांगण्यात आली, गरोदरपणात कोणता आहार व आपले आरोग्य कसे जपले पाहिजे याविषयी संबंधित डॉक्टर यांच्याकडून माहिती सांगण्यात आली. कार्यक्रमासाठी फोंडशिरस आरोग्य केंद्रातील डॉक्टर्स नर्स अशा सेविका तसेच शिवसेनेचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कुसमोड ग्रामपंचायतीची ग्रामसभा खेळीमेळीत

**सुराज्य/पिलीव**

माळशिरस तालुक्यातील कुसमोड येथील ग्रामपंचायतीची ग्रामसभा २६ जानेवारी रोजी सकाळी १० वाजता सरपंच तुषार लवटे यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.

यावेळी गावातील रस्ते, शाळा दुरुस्ती, शाळांना सुविधा पुरविणे, पाणंद रस्ते, अंगणवाडी मधील समस्या, तसेच प्रभाग दोन मधील सिंगल फेज लाईटची समस्या सोडविणे,चांदापुरी - कुसमोड - मळोली मुख्य रस्ता डांबरीकरण करणे यासह विविध विषयांवर चर्चा झाली. तसेच विविध विकासकामांचे ठरावाबाबत पाठपुरावा करण्याचे सर्वानुमते ठरले.यावेळी कृषी सहहयाक सुधीर बुगड यांनी कृषी खात्याच्या विविध योजनांची सविस्तर माहिती दिली. या ग्रामसभेस उपसरपंच राणी पवार, ग्रामपंचायत सदस्य बाळासाहेब धायगुडे, रेखा पालखे,माजी उपसरपंच संजय पाटील, सतीश व्होनमाने, पोलीस पाटील विकास सरगर, अज्ञान धायगुडे, शत्रूघ्न वाघ,लक्ष्मण पवार,अशोक राजगे,गणेश मदने, उमाजी बोडरे, देवा चव्हाण यांच्या सह अनेक मान्यवर यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सरपंच तुषार लवटे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## माळीनगर ग्रामपंचायतीवर प्रशासकाची नियुक्ती

**सुराज्य/माळीनगर**

मुदत संपल्याने माळीनगर ग्रामपंचायतवर प्रशासकांची नियुक्ती करण्यात आली आहे.या ग्रामपंचायतीच्या कारभारात सुरुळीतपणा राहावा,यासाठी माळशिरस पंचायत समितीचे विस्तार अधिकारी ए.टी डोके यांची प्रशासक म्हणून नेमणूक झाली आहे.

सोलापूर जिल्हा परिषदेने याबाबतचा आदेश जारी केला आहे.जानेवारी २०२३ अखेर मुदत संपणाऱ्या जिल्ह्यातील ग्रामपंचायतींचा कारभार सुरळीतपणे केला जावा,यासाठी प्रशासकांची नियुक्ती करण्यात आली आहे.या ग्रामपंचायतची मुदत २४ जानेवारीला संपली आहे. जानेवारीअखेर मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींची प्रभाग रचना प्रक्रिया पूर्ण होण्यास एप्रिलचा शेवटचा आठवडा उजडणार आहे.ज्या दिवसापासून नेमणूक दिलेली आहे, त्या दिवसापासून प्रशासकांनी नेमून दिलेल्या ग्रामपंचायतीकडील प्रशासक पदाचा कार्यभार स्वीकारण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

# कोगनुरे यांना कलबुर्गी येथे साधकश्री पुरस्कार प्रदान

**सुराज्य/अक्कलकोट**



कलबुर्गी (कर्नाटका) येथे 'महत्त्वाकांक्षी सामाजिक सेवा संस्था' आणि 'बिसिलनाडू पब्लिशिंग हाऊस कलबुर्गी यांच्या वतीने संस्थेच्या द्विशताब्दी वर्षानिमित्त विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांना दिला जाणारा साधकश्री पुरस्कार सामाजिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरी बद्दल एम के फाउंडेशन सोलापूर चे संस्थापक व सागर सिमेंट चे मुख्य व्यवस्थापक महादेव कोगनुरे यांना कन्नड भवन कलबुर्गी येथील समारंभात मोठ्या उत्साहात मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

कार्यक्रमास मुत्यान बालाद प.पू. श्री. गुरुपादलिंगेश्वर शिवयोगी महास्वामिजी, बसवश्री प.पू. सिद्राम शरणू बेलडा, कलबुर्गी दक्षिण चे आमदार दत्तात्रय (अप्पू गौडा) पाटील, संस्थेचे अध्यक्ष प्रभुलिंग नीलुरे यांच्यासह विवीध क्षेत्रातील नामवंत मान्यवर उपस्थित होते.

# बांधकाम कामगारांना आचेगांव येथे मध्यान्ह भोजन

**सुराज्य/अक्कलकोट**



आचेगांव (ता. दक्षिण सोलापूर) येथील नोंदणीकृत इमारत बांधकाम कामगारांसाठी दररोज दोन वेळचे मोफत मध्यान्ह भोजनाचा शुभारंभ सरपंच सौ. विश्रांती शावरसिध्द पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.


आज २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून या योजनेचा प्रायोगिक शुभारंभ करण्यात आला. नोंदणीकृत बांधकामगारांना महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या विविध बांधकाम कामगार योजना अंतर्गत योजनांचा लाभ मिळतो. यामधील एक योजना म्हणजेच मध्यान्ह भोजन योजना होय आणि याच योजनेची अमलबजावणी आता गावोगावी होण्यास सुरुवात झालेली आहे. यामध्ये भात, भाजी, व चपाती या प्रमाणे पोषक व गरम अन्न गरजू, गरीब, मजुरांना त्यांच्या पर्यंत पोहचवण्यात आले. यावेळी शावरसिध्द पाटील यांनी योजनेची सविस्तर माहिती देऊन ही योजना सरपंच विश्रांती पाटील, महिबूब पटेल, बलवान गोतसुर्वे, यांच्या माध्यमातून कायमस्वरूपी कशी राबविण्यात येईल याचा पाठपुरावा करणार असल्याचे सांगितले. नोंदणीकृत बांधकाम कामगारांना एकूण २९ योजनांचा लाभ मिळत होता परंतु आता आणखी तीन योजनाचा यामध्ये नव्याने समावेश करण्यात आल्याने हा आकडा ३२ एवढा झालेला आहे. यावेळी भाजपा अनु जाती तालुकाध्यक्ष बलवान गोतसुर्वे, उपसरपंच रफिक मुल्ला, सिध्दार्थ नवगिरे, रविकांत विधाते, महिबूब पटेल, ताजोद्दीन बिराजदार, इरफान पटेल, शफिक पटेल, नरेंद्र कांबळे, नित्यानंद खोबण, महिबूब बिराजदार या सह ग्रामपंचायत सदस्य, गावकरी उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करून गौरवले

**पुणे** : अजिंक्य डीवाय पाटील विद्यापीठाचा सातवा पदवीदान समारंभ शुक्रवारी सायंकाळी पार पडला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अजिंक्य डीवाय पाटील विद्यापीठाचे अध्यक्ष डॉ.अजिंक्य डीवाय पाटील उपस्थित होते.याप्रसंगी कुलगुरु हृदयेश देशपांडे आदी मान्यवर उपस्थितीत होते. यात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना डी.लीट. प्रदान करण्यात आली.१४ मास्टर्स अभ्यासक्रम आणि ३८ पदवी अभ्यासक्रमातील ८७९ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली.या पदवीदान समारंभात शैक्षणिक उत्कृष्टतेसाठी विविध अभ्यासक्रमातील १५१ विद्यार्थ्यांना पदके देऊन गौरविण्यात आले.

# शेतकऱ्यांवर नैसर्गिक आपत्तीनंतर महावितरण निर्मित आपत्ती

**सुराज्य/चिखली**




महावितरणकडून केल्या जाणाऱ्या कमी दाबाच्या वीज पुरवठ्यामुळे शेतकरी संकटात सापडला आहे. विहिरीत पाणी असूनही विजेच्या लपंडावाने पिकांना ते देता येत नसल्याने नैसर्गिक आपत्तीनंतर महावितरण निर्मित आपत्ती शेतकऱ्यांवर ओढवली असल्याने मोहोळ तालुक्यातील चिखली, हिवरे, यावली, कोन्हेरी आदी परिसरातील शेतकऱ्यांमधून संताप व्यक्त केला जात आहे.

मोहोळ तालुक्यातील चिखली, हिवरे , यावली, कोन्हेरी, या भागातील शेती क्षेत्रावर नेहमीच संकटे येण्याचा सिलसिला सुरू आहे. कधी दुष्काळ तर कधी अतिवृष्टी तर कधी प्रतिकूल हवामानामुळे शेतीपिकांवर होणारा परिणाम यामुळे येथील शेतकरी वर्ग संकटात सापडत आहे . गेल्या वर्षी उन्हाळा हंगामात पाणी पातळी घटल्याने पिके जळून गेली. त्यानंतर गेल्या खरीप हंगामात पिके काढणीस आली आसतानाच अतिवृष्टीने ती वाहून गेली . त्यामुळे शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका सहन करावा लागला होता . त्यानंतर यंदा सुध्दा रब्बी हंगाम उभा करण्यासाठी मोठी कसरत करावी लागली . रब्बी पिकांची कशीबशी लागवड केली आहे . ढगाळ हवामानामुळे कीटकनाशकांची फवारणी करीत पिके जगविण्याचा अटापिटा सुरू आहे . अशा या मोठ्या प्रयत्नाने वातावरणावर मात करीत शेतकरी पिकांचे स्वास्थ्य टिकविण्याचा प्रयत्न करीत असले तरी महावितरणच्या लहरी वीज पुरवठ्यामुळे मात्र पिकांची धूळधाण होऊ पाहत आहे . शेतीसाठी दिला जाणारा वीजपुरवठा तीन टप्प्यांत असला तरी दोन टप्पे हे ऐन थंडीच्या वेळेतच आहेत . एक टप्पा दिवसाचा असला तरी त्यात पण वेळोवेळी वीज खंडित होत असल्याने पिकांचे भरणे देखील होत नाही . त्यामुळे मुबलक पाणी उपलब्ध असूनही विजेच्या लहरीपणाचा फटका शेती पिकांना बसत आहे . विशेष म्हणजे - हिवरे उपकेंद्रातून शेतकऱ्यांना देण्यात आलेला शेतीपंपाचा वीज पुरवठा देखील अत्यंत कमी दाबाने होत असल्याने या भागातील शेतकऱ्यांच्या विहिरीवरील मोटारी जळून खाक होत असल्यामुळे येथील शेतकरी त्रस्त झाले आहेत .अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांची अवस्था बिकट झाली आहे . अशातच महावितरण कंपनीने शेतकऱ्यांचा जादा अंत न पाहता येतील शेतकऱ्यांना शेतीसाठी देण्यात येणारा विजेचा सप्लाय पूर्ण दाबाने देऊन वेळेतही अखंडित वीजपुरवठा करावा, अशी मागणी शेतकरी वर्गातून केली जात आहे.

### विजेचा लपंडाव

शेतीसाठी मिळणाऱ्या वेळेतील विजेचा लपंडाव होत आहे .कमी दाबाने मिळणाऱ्या विज पुरवठ्या मुळे शेतकऱ्यांच्या विहिरीला मोटारी जळत आहेत. शेती पिकांचे भरणे देखील होत नसल्याने पिकांना मोठा फटका बसत आहे . महावितरण कंपनीने उच्च दाबाने वीज पुरवठा करून या भागातील शेतकऱ्यांना आधार द्यावा.

–शिवाजी शरद मते (शेतकरी चिखली, ता.मोहोळ)

23rd YEAR

ISO 9001:2015 Certified

SEDA SOLAPUR ELECTRONICS DEALERS ASSOCIATION

भुल ना जाना,
इलेक्ट्रो में आना...

# त्वरा करा !

# आज शेवटचा दिवस

## भव्य एक्झिबिशन ग्राऊंडवर

## भव्य प्रदर्शन व विक्री

# Electro© 2023

Main Sponsorer
METZ Google TV GERMAN BRAND GERMAN ENGINEERING

Co-Sponsorers
Kelvinator
SYSKA LED LIGHT YEARS AHEAD
BPL Happy Little Things

Consumer Finance Associate BAJAJ FINSERV

यंदा वातानुकूलीत दालनासह

दररोज लकी ड्रॉ
शेवटच्या दिवशी बंपर ड्रॉ

बंपर ड्रॉ बक्षिस
₹ 69,600* किंमतीची
नवदीप सेंट्रीफ्युगल आटा चक्की



## विष्णु मिल कंपाऊंड
इंद्रधनु जवळ, सोलापूर

दि. 24 ते 30 जानेवारी, 2023
दु. 4 ते रात्री 9.30

हा क्युआर कोड स्कॅन करा
आणि आकर्षक बक्षिसं जिंका !

A/C Tent Stalls | Up To 15000 Visitors Per Day | 300+ Stalls | 7 Days | 8 Acres | Food Court | FREE PARKING | BLOOD DONATION

*अटी लागू

Jhaveri

# पोलीस अधिकाऱ्याच्या गोळीबारात ओडिशाचे आरोग्यमंत्री ठार

✔ सुराज्य/ओडिशा

**ओडिशाचे आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री आणि ज्येष्ठ बिजू जनता दल (बीजेडी) नेते नबा दास यांच्यावर पोलिस अधिकाऱ्याने केलेल्या गोळीबारात ते ठार झाले. दास पश्चिम ओडिशातील झारसुगुडा जिल्ह्यात रविवारी ब्रजराजनगरमध्ये दिवसाढवळ्या एका सहाय्यक उपनिरीक्षकाने नबा दास यांच्यावर गोळीबार केल्याने गंभीर जखमी झाले आहेत. त्यांची झुंज अखेर अपयशी ठरली.**

६० वर्षीय दास हे एका कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी गांधी चौकात आपल्या कारमधून उतरत असताना सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक गोपाल दास यांनी त्याच्यावर पॉइंट ब्लँक रेंजमधून गोळीबार केला. या हल्ल्यात ते गंभीर जखमी झाले. दरम्यान, या घटनेनंतर उपविभागीय पोलीस अधिकारी गुप्तेश्वर भोई यांनी सांगितले की, 'नबा दास यांच्या छातीवर डाव्या बाजूला गोळ्या लागल्या आहेत. एएसआयच्या रिव्हॉल्व्हरमधून काही गोळ्या लागल्याने शेजारी असलेला एक पोलीस कर्मचारी जखमी झाला आहे. एएसआयने मंत्र्यांवर गोळीबार का केला? हे जाणून घेण्यासाठी आम्ही एएसआयची चौकशी करत असल्याचेही भोई यांनी सांगितले.

या घटनेनंतर दास यांना तातडीने स्थानिक रुग्णालयात दाखल करण्यात आले. दरम्यान, पुढील उपचारासाठी नबा दास यांना एअरलिफ्ट करून भुवनेश्वरला हलवण्यात आलं आहे. तीनवेळा आमदार राहिलेले नबा दास या महिन्यात त्रिवेणी अमावस्येच्या मुहूर्तावर महाराष्ट्रातील शनि शिंगणापूर मंदिराला १ कोटींपेक्षा जास्त किमतीचा १.७ किलो सोने आणि ५ किलो चांदीचा कलश दान केल्यानंतर चर्चेत आले होते. नवीन पटनायक मंत्रिमंडळातील मुख्यमंत्र्यांनंतर ते प्रभावशाली नेते असून दुसरे सर्वात श्रीमंत मंत्री आहेत.

## आठवडाभरापूर्वीच एक कोटीचा सोन्याचा कलश दान

मंत्री नबा किशोर दास यांनी महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यातील शिंगणापूर येथील शनी मंदिर ट्रस्टला एक कोटी रुपयांचा सोन्याचा आणि चांदीचा कलश दान केला होता. मिळालेल्या माहितीनुसार, प्रसिद्ध शनी मंदिरात कलश म्हणून वापरण्यात येणारा घागर बनवण्यासाठी ७०० ग्रॅम सोने आणि ५ किलो चांदीचा वापर करण्यात आला आहे. दास यांनी दान केलेले कलश हे शनी मंदिराला दिलेले आतापर्यंतचे सर्वात महागडे दान आहे. दास आपल्या कुटुंबीयांसह मंदिरात पोहोचले आणि मंत्रोच्चार करत कलश दान केले होते. आनंद भलगट नावाच्या एका कारागिराने हा कलश बनवला आहे.





# उद्योगांसाठी आता 'कृती दल'

## नवउद्योगांच्या आढाव्यासाठी सरकारचा निर्णय

✔ सुराज्य/मुंबई

**तब्बल दीड लाख कोटींचा वेदांता-फॉक्सकॉन प्रकल्प गुजरातमध्ये गेल्यानंतर विरोधक आणि सत्ताधाऱ्यांमध्ये राज्यातील उद्योगांवरून जोरदार वाद रंगला असतानाच, राज्य सरकारने नवा निर्णय घेतला आहे. राज्यात नवे उद्योग येण्यासंदर्भात काय पूरक परिस्थिती असायला हवी यासाठी, तसेच शिंदे-फडणवीस सरकारकडून उद्योग विभागांतर्गत केलेल्या आणि भविष्यात होणाऱ्या विविध सामंजस्य करारांचा आणि इतर प्रलंबित महत्त्वाच्या विषयांचा आढावा घेण्यासाठी आता 'कृतिदल' स्थापन करण्यात आला आहे.**

राज्यातील अनेक उद्योग परराज्यात चालल्याने विरोधकांनी सत्ताधाऱ्यांवर टीकेची झोड उठवली आहे. त्यामुळे आता राज्यातील असलेल्या उद्योगांचा आढावा घेण्यासाठी, तसेच नवे उद्योग राज्यात येण्यासाठी काय प्रयत्न करावे लागतील, याची कारणमीमांसा करण्यासाठी कृतिदलाची स्थापना करण्यात आली आहे. गुंतवणूकदारांच्या अडचणी व गुंतवणुकीतील अडथळ्यांबाबत कृतिदलाच्या बैठकीत होणाऱ्या निर्णयांच्या अंमलबजावणीसाठी आवश्यकतेप्रमाणे संबंधित विभाग व अधिकाऱ्यांशी संपर्क करणे, सरकारच्या वतीने करण्यात आलेल्या सामंजस्य



करारांचा पाठपुरावा करणे, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडील, तसेच त्यांच्या क्षेत्राबाहेरील भूसंपादन व जमीनवाटप यासंबंधीची कार्यवाही करणे, उद्योग स्थापित करण्यासाठी अत्यावश्यक असलेल्या मंजुऱ्यांसंदर्भात आढावा घेणे, आदी कामे या कृतिदलाकडून करण्यात येणार आहेत.

उद्योग विभागाचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव आणि सचिव, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे सह मुख्य कार्यकारी अधिकारी (स्पेशल प्रोजेक्टस), उद्योग विभागाचे विकास आयुक्त तसेच एमएमआरडीए, सिडको, नगर विकास, पर्यावरण, ऊर्जा, कामगार, महसूल व वन विभाग व इतर विभागांशी संबंधित निमंत्रित सदस्य हे या कृती दलात काम करतील.

# भीमाशंकर जंगलात 'स्ट्रॉबेरीचे' मळे

✔ सुराज्य/पुणे

**जगभरात ख्याती मिळवलेल्या महाबळेश्वरच्या स्ट्रॉबेरीला टक्कर देण्यासाठी भीमाशंकरची स्ट्रॉबेरी सज्ज झाली आहे. जंगलाच्या नजीक वास्तव्य करणाऱ्या आदिवासींना देण्यात आलेल्या प्रशिक्षणामुळे त्यांनी स्ट्रॉबेरीची सेंद्रीय शेती सुरू केली असून, पहिल्याच हंगामात पर्यटकांचा 'न भूतो न भविष्यति' उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे.**

या माध्यमातून आदिवासींचे वनांवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी वन विभागाने त्यांना अर्थार्जनाचा शाश्वत पर्याय उपलब्ध करून दिला आहे. भीमाशंकर अभयारण्यालगतच्या गावांमधील अनेक आदिवासी वन उपजावर अवलंबून आहेत. ते छोट्या प्रमाणात शेतीही करतात. त्यामुळे त्यांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी वन विभागाने आयसीआयसीआय फाउंडेशन' बरोबर करार केला आहे. त्याद्वारे गावकऱ्यांना आणि तरुणांना अर्थार्जनाचे इतर पर्याय उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

महाबळेश्वर आणि भीमाशंकरमधील हवामानामध्ये कमालीचे साधर्म्य असल्याने स्ट्रॉबेरीची शेती सुरू करण्यासाठी आम्ही पाच गावांची निवड केली. नोव्हेंबरमध्ये आम्ही २५ शेतकऱ्यांना स्ट्रॉबेरीच्या शेतीचे प्रशिक्षण दिले. सुरुवातीला शेतकऱ्यांना आम्ही स्ट्रॉबेरीची रोपे आणि इतर साहित्य भेट दिले. समन्वयकांनी नियमित देखरेख केली. त्यामुळे पहिल्याच प्रयत्नात चांगले यश आले असून, उत्तम गुणवत्तेच्या, लाल चुटूक स्ट्रॉबेरीचे उत्पादन शेतकऱ्यांनी घेतले आहे,' अशी माहिती आयसीआयसीआय फाउंडेशन'चे प्रकल्प अधिकारी दीपक पाटील यांनी दिली.



नोव्हेंबरपासून स्ट्रॉबेरीचे उत्पादन सुरू झाले असून, हा हंगाम मार्चपर्यंत राहील. भीमाशंकर परिसरात यापूर्वी कधीही स्ट्रॉबेरीची लागवड झालेली नाही. त्यामुळे उत्पादन हाती येताच गावकरी ते बाजारात घेऊन गेले. भीमाशंकर मंदिराच्या आवारात विक्री सुरू केली की काही तासांतच स्ट्रॉबेरी संपते. विशेष म्हणजे पाच गावांतील केवळ २५ गुंठ्यांमध्ये स्ट्रॉबेरीचे उत्पादन घेण्यात आले आहे. पुढील वर्षी आम्ही क्षेत्र वाढविणार आहोत, असेही पाटील यांनी सांगितले.

# जागतिक परिषदेत पुण्याचा डंका

## शून्य कचरा नियोजनासाठी 'फिलिपिन्स'मध्ये गौरव

✔ सुराज्य/पुणे : शाश्वत पर्यायांचा वापर करून कचरा नियोजनातील उल्लेखनीय कार्याबद्दल पुणे महापालिकेच्या सर्वसमावेशक स्वच्छ मॉडेलला आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरविण्यात आले आहे. फिलिपिन्समधील मनिला या शहरात झालेल्या 'ग्लोबल अलायन्स फॉर इन्सिनरेटर अल्टरनेटिव्हज'तर्फे (गाया) आयोजित विशेष कार्यक्रमात पुण्याचा सन्मान करून उपक्रमाच्या संस्थापक सदस्यपदी नियुक्तीही करण्यात आली.

बदलत्या जीवनशैलीमुळे वाढत्या कचऱ्याचे नियोजन, विल्हेवाट आणि यातून निर्माण होणाऱ्या पर्यावरणीय समस्यांचे आव्हान जगातील सर्वच देशांना भेडसावत आहे. ही समस्या सोडविण्यासाठी 'पुणे महापालिका आणि कचरा वेचकांच्या स्वच्छ' संस्थेने गेल्या पंधरा वर्षांत एकत्रितपणे शून्य कचऱ्याच्या दिशेने केलेल्या केलेल्या वाटचालीची दखल या परिषदेत घेण्यात आली.

## सीमाशुल्क विभागाची मोठी कारवाई

# मुंबई विमानतळावर ९.५ किलोचे सोने जप्त

✔ सुराज्य/मुंबई

**मुंबई विमानतळावर ९.५ किलोचे सोने जप्त करण्यात आले असून सीमाशुल्क विभागाकडून मोठी कारवाई करण्यात आली आहे. सीमाशुल्क विभागाने वेगवेगळ्या आठ प्रकरणांमध्ये सुमारे ९.५ किलोचे सोने जप्त केले आहे. ज्याची बाजारातील किंमत ४.७५ कोटी रुपये असल्याचे सांगितले जात आहे.**

तस्करीचे २.९९ कोटी रुपयांचे ६००० ग्रॅम सोने घेऊन दुबईहून आलेल्या दोन अझरबैजान नागरिकांना अटक करण्यात आली असल्याची माहिती सीमाशुल्क विभागाने दिली आहे.

दोन दिवसांपूर्वीही सोन्याची तस्करी करणाऱ्यांवर सीमाशुल्क विभागाने मोठी कारवाई केली होती. मेणात लपवून आठ किलो सोने आणणाऱ्या व्यक्तीला मुंबई विमानतळावर पकडून सोने जप्त करण्यात आले होते. ४.१४ कोटी रुपयांचे सोने दुबईतून आणणाऱ्या आखाती नागरिकाला सीमाशुल्क अधिकाऱ्यांनी अटक केली होती.

मेणाचे गोळे करत त्यात लपवून आणलेले ८ किलो सोने सीमाशुल्क



अधिकाऱ्यांनी पकडले. याची आंतरराष्ट्रीय बाजारातील किंमत ४ कोटी १४ लाख रुपये इतकी आहे.

या प्रकरणी तब्बल ११ परदेशी नागरिकांना अटक करण्यात आली होती. शारजा येथून मुंबईत आलेले हे प्रवासी सोन्याची तस्करी करत असल्याची माहिती अधिकाऱ्यांना मिळाली होती. या नागरिकांनी मेणाच्या लहान गोळ्या करुन त्यात हे सोने लपवले होते.

# पाकिस्तानची आर्थिक स्थिती ढासळली

## ३० लाखांच्या कोंबड्या चोरल्या

✔ **सुराज्य/रावळपिंडी : पाकिस्तान सैन्याच्या मुख्यालयाजवळून पाच हजार कोंबड्या चोरीला गेल्याची माहिती समोर आली आहे. या पाच हजार कोंबड्यांची किमत ३० लाख रुपये असल्याचे बोलले जात आहे. पाकिस्तानची आर्थिक स्थिती ढासळली जात आहे. जीवनावश्यक वस्तूंचा तुटवडा असल्याने ही चोरी झाल्याचा अंदाज वर्तवण्यात येत आहे.**



गेल्या काही दिवसांपासून पाकची अर्थव्यवस्था डबघाईला आली आहे. तेथील जीवनावश्यक वस्तूंचे भाव गगनाला भिडले आहेत. जीवनावश्यक वस्तूंचा तुटवडा असल्याने नागरिकांमध्ये संताप आहे. परिस्थिती हाताबाहेर जाऊ नये यासाठी सरकार व प्रशासन नियोजन करत आहे. वीजेची मागणी व थकबाकी याचा मेळ घालण्यासाठी पाक सरकारने रात्री ८ नंतर दुकाने बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. विवाह समारंभासाठी रात्री १०पर्यंतची परवानगी देण्यात आली आहे.

# बोम्मईंची सत्ता जाणार; शरद पवारांचे भाकीत

✔ सुराज्य/मुंबई : काँग्रेस आणि जेडीएसचे सरकार फोडून सत्ता स्थापन केलेल्या कर्नाटकमध्ये बोम्मईंची सत्ता पुढील निवडणुकीत जाणार असल्याचं भाकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी केलं आहे. कोल्हापूर दौऱ्यावर असताना शरद पवार यांनी माध्यमांशी बोलताना हे विधान केलं आहे. यावेळी कर्नाटकच्या आगामी निवडणुकीवरही शरद पवारांनी आपलं मत व्यक्त केलं. आगामी राज्यांच्या निवडणुकांत कर्नाटकात भाजपची सत्ता येणार नाही, असं स्पष्ट भाकीत पवारांनी केलं. यावर



ते पुढे म्हणाले की, यावेळी लोकसभा आणि महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुका एकत्र घेण्याचा प्रयत्न सुरु आहेत. परंतु सर्व राज्यांमध्ये वेगवेगळे स्थानिक प्रश्न आहेत, ज्यांना सामोरे जाणे आवश्यक आहे.

# लव्ह जिहाद धर्मांतर विरोधात सकल मराठा समाजाचा हिंदू जन आक्रोश मोर्चा

✔ **सुराज्य/मुंबई : लव्ह जिहाद आणि धर्मांतर विरोधी कायद्याच्या मागणीसाठी आज मुंबईत सकल हिंदू समाजाकडून हिंदू जन आक्रोश मोर्चा सुरु आहे. दादरमधील छत्रपती शिवाजी पार्कमधून सुरु झालेला हा मोर्चा प्रभादेवीमधील कामगार मैदानाजवळ येऊन थांबणार आहे. लव्ह जिहाद आणि धर्मांतर विरोधी कायदा लागू करण्याच्या मागणीसाठी हे मोर्चेकरी रस्त्यावर उरले होते.**

या मोर्चात भाजप नेते आशिष शेलार, खासदार मनोज कोटक, किरीट सोमय्या, चित्रा वाघ, आमदार नितेश राणे, आमदार सदा सरवणकर, आमदार प्रसाद लाड, विधान परिषदेचे माजी विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर, केशव उपाध्ये, खासदार गोपाळ शेट्टी, वकील गुणरत्न सदावर्ते यांच्यासह शेकडो भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते सहभागी झाले होते, यासह मोर्चात मोठ्या संख्येने महिला देखील सहभागी झाल्या होत्या. लव्ह जिहादमध्ये अडकलेल्या मुलींचे कुटुंब आणि ज्यांना फसवण्यात आलं अशा काही पीडिताही या मोर्चात सहभागी झाल्या होत्या, अशी माहिती समोर येत आहे. यावेळी मोर्चेकरींनी मोठ्या प्रमाणात नारीशक्तींच्या देखील घोषणा दिल्या. मोर्चात सहभागी नागरिकांची संख्या वाढत आहे.

मोर्चाचं नेतृत्व महिला करत आहेत. याठिकाणी एक सभा देखील होणार आहे. 'जो हिंदू हित का काम करेगा, वही देश पे राज करेगा, गर्व से कहो हिंदू है' अशाप्रकारच्या घोषणा देण्यात आल्या आहेत. हातात भगवे झेंडे, अंगात भगवे कपडे घालून हजारो लोक शिवाजी पार्कात एकवटले आहेत. मोर्चेकऱ्यांच्या हातात भूमी रक्षा, राष्ट्र सुरक्षा असं लिहिलेले फलक दिसत आहेत.



# दागिन्यांच्या हव्यासातून मित्राला संपवले

## मृतदेह ड्रममध्ये टाकून घर बांधण्याच्या जागेत पुरला

✔ सुराज्य/पुणे

**वेल्हे तालुक्यात काही दिवसांपूर्वी शिवीगाळ केल्याच्या रागातून दोन भावांनी एका व्यक्तीचा लोखंडी रॉड, वीट आणि लोखंडी वस्तू डोक्यात मारून खून केला होता. आता या प्रकरणात एक धक्कादायक माहिती समोर आली आहे. संबधित व्यक्तीकडे असणाऱ्या सोने चांदीच्या हव्यासापोटी हा खून केल्याचे निष्पन्न झाले आहे. आरोपींकडून १ कोटी ८३ ला ७६ हजार १६५ रुपयांचे सोने-चांदीचे दागिने आणि रोख रक्कमचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे.**

वेल्हे पोलिसांनी या प्रकरणी नितीन रामभाऊ निवांगुने, विजय दत्तात्रय निवांगुणे, ओमकार नितीन निवांगुणे आणि आणखी एक अशा चार जणांना



ताब्यात घेतले आहे. याबाबत पोलिसांनी माहिती दिली आहे. मृत विजय काळोखे याने घरातून निघताना सोबत सोने, चांदी आणि रोख रक्कम घेऊन गेल्याची माहिती त्याच्या नातेवाईकांनी दिली. यानंतर वेल्हे पोलिसांनी नितीन नीवांगुणे याला चौकशीसाठी ताब्यात घेतले. तेव्हा त्याने गुन्ह्याची कबुली दिली.

विजय प्रफुल्ल काळोखे हा सोने चांदीचे दागीने आणि रोख रक्कम घेवून घरी आला होता. ही माहिती त्यांना समजली. ते सोने-चांदीचे दागीने आणि रोख रक्कम पाहून हव्यासापोटी आरोपीने कात्रजमधील संतोषनगर येथे स्टीलच्या चिमटयाने विजय प्रफुल्ल काळोखे याच्या डोक्यात आणि तोंडावर मारून त्याला जबर जखमी करून त्याचा खून केला. आणि पुरावा नष्ट व्हावा, या उद्देशाने त्याचा मृतदेह प्लास्टिकच्या बॅरलमध्ये टाकला.

मृतदेह असलेला प्लास्टीकचा बॅरल उचलून इनोव्हा कारमध्ये टाकून मौजे रानवडी (ता. वेल्हे, जि. पुणे) येथे आरोपी नितीन निवांगुणे याने शेतजमीन गट नं ४० मध्ये आरोपी विजय दत्तात्रय निवांगुणे याच्या मदतीने खड्ड्यात पुरला, अशी माहिती त्याने दिली. त्यानुसार पोलिसांनी सर्व आरोपींना ताब्यात घेतले आहे. सोने-चांदी आणि मुद्देमाल आरोपींकडून पोलिसांनी जप्त केला आहे.

# परंडा उपजिल्हा रुग्णालयातील महिला डॉक्टरचा विनयभंग; डॉ.मोरे विरुध्द गुन्हा दाखला

✔ सुराज्य/परंडा

उप जिल्हा रुग्णालयात कार्यरत असलेले कंत्राटी डॉक्टर आनंद मोरे यांनी महिला डॉक्टरचा विनयभंग केल्याची घटना घडली असून डॉ.आनंद मोरे विरुद्ध परंडा पोलीस ठाण्यात विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या घटणेनंतर उपजिल्हा रुग्णालयात डॉ.मोरे व महिला डॉक्टरचे पती राकेश सूर्यवंशी यांच्यात हाणामारी झाल्याने डॉ. मोरे यांच्या फिर्यादी वरून दोघा विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आले.

उप जिल्हा रुग्णालयातील कंत्राटी महिला डॉक्टर यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की दि २८ रोजी आरोपी डॉ.मोरे यांनी मागील वैद्यकीय भांडणाच्या कारणा वरून अश्लील भाषेत शिवीगाळ करीत वाईट हेतूने हात धरून ओढला तसेच त्यांच्या पतीस लाथा बुक्क्यांनी मारहाण केली व जिवे मारण्याची धमकी दिली.

तर डॉ. आनंद मोरे यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की गुरुदास कांबळे यांच्या मदतीने तक्रारी अर्ज देतात असे गृहीत धरून पि.ही.





सी. पाईपने मारहाण करून जखमी केले व जिवे मारण्याची धमकी दिली. महिला डॉक्टर यांनी गेल्या वर्षी कोरोना काळात नियमांचा पालन केले नसल्याची तक्रारी अर्ज गुरुदास कांबळे यांनी दाखल केला होता. मात्र आपण कोणताही नियम तोडला नही मला जाणीव पुर्वक त्रास देण्यासाठी खोट्या तक्रारी करीत असल्याचे महिला डॉक्टर यांनी सांगितले आहे. उप जिल्हा रुग्णालयात महिला डॉक्टरचा विनयभंग झाला ही घटना लाजिरवाणी असल्याने उप जिल्हा रुग्णालय प्रशासनाने याची गंभीर दखल घेण्याची गरज आहे.




काय म्हणतयं? पॉलिटिक्स

# ‘बुडाला’ पाणी घाला, फाद्यांना नको...

पुरुषोत्तम कुलकर्णी

**देशात काँग्रेसला पुनर्वैभव प्राप्त करून देण्यासाठी अ.भा.काँग्रेस महासमितीने ‘हात से हात जोडो’ हे एक महत्वाकांक्षी अभियान प्रजासत्ताक दिनापासून सुरू केले आहे. त्याला प्रतिसाद म्हणून सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीची बैठक गुरूवारी काँग्रेसभवनमध्ये पार पडली. विविध उपक्रमातून हे अभियान घराघरापर्यंत पोहचवा,असे आवाहन जिल्हाध्यक्ष डॉ.धवलसिंह मोहिते-पाटील यांनी उपस्थित पदाधिकाऱ्यांना केले.**

दिल्लीपासून ते गल्लीपर्यंत काँग्रेसला अवकळा आली आहे ही वस्तुस्थिती आहे. अवकळा म्हणजे सत्ता नसलेला पक्ष. थोडक्यात सांगायचे झाले तर सत्तेत असलेला पक्ष ‘राव’ तर सत्ता नसलेला पक्ष म्हणजे ‘रंक’. एखादा अनुत्तीण झालेला विद्यार्थी शिक्षण तिथेच अर्धवट सोडत नाही,तर तो पुन्हा परीक्षा देवून आपले भवितव्य अजमावत असतो. त्याच धर्तीवर काँग्रेस पक्ष पुन्हा कात टाकू पहात आहे. फिनिक्स पक्षाने राखेतून जशी झेप घेतली,त्याप्रमाणे हा काँग्रेस पक्ष पुन्हा भरारी घेवू पहात आहे.



अपयश हे येतच असते. अशावेळी नवे ध्येय ठेवून नवा प्रगतीचा मार्ग स्वीकारावा लागतो. त्यानुसार हे अभियान घेवून काँग्रेस घराघरात जाणार आहे.हा एक चांगला विचार आहेच. पक्षाविषयी पोस्टमार्टेम करण्याअगोदर या अभियानाला पहिल्यांदा शुभेच्छा देणे केव्हाही इष्ट ठरेल.

सोलापूर जिल्ह्यातील अकरा तालुक्यांमध्ये एकेकाळी काँग्रेसची हुकूमत होती.झेडपी, महापालिका,पंचायत समित्या, नगरपालिका आणि ग्रामपंचायत या स्तरावर जिकडे पाहिले जाई, तिकडे काँग्रेसचा तिरंगा पहायला मिळायचा. १९९० नंतर राजकारणाची कूस बदलत गेली. मतदारांची मानसिकता चेंज होत राहिली. हा बदल काँग्रेस नेत्यांचा वेळीच लक्षात आला नाही. खासदार,आमदार, पदाधिकारी, झेडपी, कार्पोरेशन, पंचायत समित्या याठिकाणचे सदस्य केवळ सत्तेची फळे खात बसले. या सर्वांनी ही फळे इतकी ओरबडून खाल्ली की,काँग्रेसरूपी वृक्षाच्या पाने गळून पडली. फांद्या तुटल्या. कारण या वृक्षाच्या मुळाला कुणी खत आणि पाणी घालण्याची काळजीच घेतली नाही. त्यातून हे वृक्ष निस्तेज झाले आहे. या वृक्षाची सावली गेली म्हणून अनेक वर्षे सत्तेत मश्गूल राहिलेली मंडळी आचार-विचार न करता अन्य पक्षांच्या आश्रयाला गेली. जे लोक काँग्रेसशी निष्ठा ठेवून राहिले,त्यांच्यात घरोघरी जाण्याची ताकत आहेच कुठे? केंद्रात आठ वर्षे तर राज्यात २०१४ पासून काँग्रेसची सत्ता नाही. अडीच वर्षे महाविकास आघाडीच्या सत्तेत लोकांचे जावू द्या. काँग्रेसच्या पदरात काय पडले? हा खरा प्रश्न आहे.काँग्रेसमध्ये उलटा प्रवास सुरू असल्याचे पहायला मिळते.निसर्ग नियमाप्रमाणे वृक्षाच्या बुडाला पाणी घालण्याची गरज असते.त्याखेरीज वृक्ष बहरणार नाही. पण काँग्रेसचे नेते बुडाऐवजी फाद्यांना पाणी मारत बसले आहेत. बूड म्हणजे कार्यकर्ता. हे नेत्यांच्या लक्षात का येत नाही? फांद्या म्हणजे फळे चाखलेले.


सोलापूर जिल्ह्यात शहरमध्यच्या माध्यमातून प्रणिती शिंदे ह्या काँग्रेसच्या एकमेव आमदार आहेत.ना खासदार- ना आमदार. झेडपी नाही ना महापालिका. पंचायत समित्या शोधाव्या लागतील. तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष कोण आहेत, याचाही शोध घ्यावा लागेल. ग्रामीण भागात किती गावांमध्ये काँग्रेसच्या शाखा आहेत? शहरात किती ठिकाणी बूथ आहेत? काँग्रेस भवनमध्ये बसून लोकांचे प्रश्न सोडवले का? लोकांचे प्रश्न कळावेत म्हणून कधी जनता दरबार घेतला का? तालुका पातळीवर शिबिरे घेवून कार्यकर्त्यांमध्ये काँग्रेसची विचारधारा रूजवली का? तालुक्यांमधून नेतृत्व उभे केले काय? गावागावांमधील कार्यकर्त्यांच्या भावना जिल्हा-शहर पातळीवरील हायकमांडने कधी जाणून घेतल्या आहेत काय? काँग्रेसमध्ये राहून सत्ता उपभोगलेल्यांनी या प्रश्नांची उत्तरे द्यायलाच हवीत. लोकांच्या वेदना, त्यांचे प्रश्न काँग्रेस भवनपर्यंत थडकतच नाहीत तेव्हा हात कोणाला जोडणार?

## हा आदर्श कुणी घेईल काय?



या निमित्ताने काँग्रेसचे दिवंगत नेते प्रतापसिंह मोहिते-पाटील यांची आठवण आल्यावाचून राहात नाही.१९९३ मध्ये जो भूकंप झाला,त्याने सोलापूर जिल्ह्यात घरांची मोठी पडझड होवून सामान्यजन रस्त्यावर आले होते. त्यावर्षात झेडपीवर काँग्रेसची सत्ता होती व प्रतापसिंह हे अध्यक्ष होते. जिल्ह्यात घरांचे नुकसान झाल्याची माहिती त्यांना मिळाली आणि ते घराबाहेर पडले. त्यावेळी त्यांच्या एका पायावर शस्त्रक्रिया झाली होती. डॉक्टरांनी विश्रांतीचा सल्ला दिला होता.कार्यकर्त्यांनी अडवले पण त्यांनी न ा ह ी ऐकले.‘माझा जिल्हा अडचणीत असताना मी स्वस्थ बसून कसे चालेल?’ असे म्हणत त्यांनी कुबड्या घेवून जिल्ह्याचा दौरा केला. एक हाक देताच पदाधिकारी व कार्यकर्ते धावून आले. त्यांनी आवाहन करताच कार्यकर्त्यांनी गावा गावात पत्र्यांचे शेड उभे करून गरिबांसाठी आसरा निर्माण केला होता. पुढे पडझड झालेल्या घरांच्या दुरूस्तीसाठी त्यांनी शासन दरबारी भगिरथ प्रयत्न करून अनुदान खेचून आणले होते. लोकांचे प्रश्न असे हाताळावे लागतात. लोकांची तळमळ नेत्याला वेळीच लक्षात यायला हवी. काँग्रेसमध्ये असा तळमळीचा नेता तयार होईल काय?

## आता निवडणुकीचा नाद सोडाच...



ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे यांना या सर्व बाबींचा गांभिर्याने विचार करावा लागणार आहे.त्यांनी आता निवडणुकीच ा नाद सोडून दिला पाहिजे. खासदारकी अजून पाच वर्षे नाही आली तरी चालेल पण जिल्ह्यातील जुन्या व नव्या नेत्यांना सोबत घेवून त्यांनी जिल्हा पिंजून काढला पाहिजे.गावपातळीवरील तसेच तालुकास्तरावरील काँग्रेस कमिट्या ‘चार्ज’ केल्या पाहिजेत. उतारवयात पक्ष संघटना मजबूत करण्याचे काम त्यांच्या हातून व्हावे,अशी जाणकारांची अपेक्षा आहे. चिंतनच नाही केवळ चिंता करून उपयोग क ा य? शिवसेना व भाजप श्रेष्ठींची पक्षावर जशी कमांड आहे,तशी पकड काँग्रेसवर का नाही? असाही जाणकारांचा सवाल आहे. ग्रामीण भागात पुन्हा मूळ रूजवल्याखेरीज काँग्रेसचे वृक्ष बहरणार नाही. अन्यथा पुन्हा काँग्रेसला लोक हात जोडत राहतील. याची दखल शिंदेंना घ्यावी लागणार आहे.

# समविचारी आघाडीमुळे कार्यकर्ते अस्वस्थ, रिचेबल नेतृत्वाच्या शोधात

सूरज सरवदे

मंगळवेढा येथे श्री संत दामाजी सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीच्या निमित्ताने परिचारक - भालके समविचारी आघाडी निर्माण झाली. आमदार समाधान आवताडे यांना बाजूला ठेवण्यासाठी येणाऱ्या सर्व निवडणुका मंगळवेढ्यात समविचारी आघाडी एकत्रित लढविण्याचा मानस आहे. मात्र परिचारक - भालके यांच्या समविचारी आघाडीला पंढरपुरातून विरोध होतोय. कार्यकर्ते सक्षम नेतृत्व शोधण्याच्या तयारीत असल्याची माहिती मिळत आहे. ज्यांच्या सोबत गेल्या पंधरा वर्षापासून आपण राजकीय संघर्ष करत आलो आहोत, त्यांच्यासोबत मांडीला मांडी लावून भगीरथ भालके यांनी बसू नये, अशी कार्यकर्त्यांची अपेक्षा आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सचिव श्रीकांत शिंदे यांनी परिचारक - भालके यांची युती अमान्य केली आहे. माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करण्याचा सल्ला त्यांनी दिला आहे.









अडीच वर्षे सोडली तर गेल्या पंचवीस वर्षापासून पंढरपूर नगरपालिकेवर प्रशांत परिचारक यांचे एक हाती वर्चस्व आहे. अनेक वर्षे नगरपालिकेत परिचारक यांना विरोध करून कार्यकर्त्यांनी वाईटपणा घेतला आहे. त्यामुळे परिचारक यांच्या विरोधात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना मंगळवेढा येथील समविचारी आघाडी मान्य होताना दिसत नाही. पंढरपूर नगरपालिकेची सत्ता हस्तगत करण्यासाठी परिचारकांना विरोध करावा लागेल आणि तो करत असताना मंगळवेढा येथे युती असेल तर पंढरपूरमध्ये परिचारक यांच्यावर टीका करताना अडचणी निर्माण होतील, या भावनेने पंढरपुरातील आजी-माजी नगरसेवक, कार्यकर्ते हे अस्वस्थ झाले आहेत. कोणाला विरोध करायचा हेच कार्यकर्त्यांच्या लक्षात येत नाही. आपण स्वतःहून आपल्या पायावर दगड मारून घेत आहोत अशी भावना कार्यकर्त्यांमध्ये निर्माण झाली आहे.

मंगळवेढा येथे आमदार आवताडे यांना सत्तेतून दूर खेचण्यासाठी माजी आमदार प्रशांत परिचारक आणि भगीरथ भालके यांचे कार्यकर्ते एकत्र आले आहेत. मंगळवेढामध्ये स्थानिक कार्यकर्त्यांच्या मागणीनुसार सविचारी आघाडीची निर्मिती झाल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र पंढरपुरात या उलट चित्र पाहायला मिळत आहे. पंढरपुरातील कार्यकर्ते हे भालके यांच्यापासून दूर जाताना दिसत आहेत. भगीरथ भालके यांचा आजी - माजी नगरसेवक आणि कार्यकर्त्यांशी पहिल्यासारखा संवाद राहिला नाही, संपर्क राहिला नाही, असे कार्यकर्ते सांगतात. परिचारक यांच्या विरोधात लढण्यासाठी कार्यकर्त्यांना पाठबळ, पाठिंबा आवश्यक आहे. तो मिळताना दिसत नाही. त्यामुळे आजी-माजी नगरसेवक आणि कार्यकर्ते नव्या नेतृत्वाच्या शोधामध्ये आहेत. कार्यकर्ते आता रिचेबल नेतृत्वाच्या शोधात आहेत. आपल्या पाठीशी असणारा नेता, आपल्याला पाठबळ देणारा नेतृत्व त्यांना मिळाल्यानंतर पंढरपूरच्या राजकारणात मोठा भूकंप होणार असल्याचे बोलले जात आहे. येणाऱ्या काळामध्ये आमदार समाधान आवताडे आणि अभिजीत पाटील गटामध्ये मोठ्या प्रमाणावर इनकमिंग सुरू होणार असल्याची खात्रीलायक माहिती मिळत आहे. कणखर नेतृत्व अभावी अनेकांना गट बदलावे लागत आहेत. त्यामुळे येणाऱ्या काळात पंढरपुरात समाधान अवताडे आणि अभिजीत पाटील यांच्या गटाला फायदा होणार आहे.

# लंडनपेक्षा आर्यनचा जीव रमतोय बार्शीत!

सचिन अपसिंगकर

**राज्याच्या राजकारणात गेली साडे चार दशके सक्रिय असलेल्या माजी मंत्री दिलीप सोपल यांचे नातू आर्यन सोपल यांच्या वाढदिवसानिमित्त नुकताच सोपल गटाचा मेळावा झाला. या मेळाव्यात आर्यन सोपल यांनी केलेल्या भाषणातून त्यांचे वैचारिक प्रगल्भता आणि परिपक्वता जाणवली. वयाच्या २१ व्या वर्षी त्यांनी केलेले चिंतनपर भाषण त्यांची राजकीय ओढ दर्शविणारेच होते.**



सध्या ते शिक्षणानिमित्त लंडन येथे वास्तव्यास असले तरी त्यांचा जीव बार्शीच्या राजकारणातच रमतोय याची प्रचिती त्यांच्या भाषणातून आली. आर्यन सोपल यांनी वयाच्या १२व्या वर्षी बार्शीतील भगवंत मैदानावरील विराट सभेत राष्ट्रीय नेते शरद पवार यांच्या उपस्थितीमध्ये जाहीर भाषण केले होते. त्यांचा सभाधीटपणा त्यावेळीही स्पष्टपणे जाणवला होता. आर्यन गेली आठ वर्षे बार्शी तालुक्याच्या काणाकोपऱ्यात फिरत आहेत. गेल्या विधानसभा निवडणुकीनंतर त्यांचा बार्शीबरोबर कम्युनिकेशन गॅप झाला असता तरी त्यांनी आपली नाळ बार्शीच्या राजकारणाशी कायम जोडलेली आहे. दिलीप सोपल यांच्यासारखे राजकीय विद्यापीठ आर्यन सोपल यांना घरातच लाभले आहे. औद्योगिक वसाहतीचे अध्यक्ष सुधीरभाऊ सोपल यांचा बार्शी तालुक्याच्या समाजजीवनात आणि विशेषत: व्यापारी, उद्योजक वर्गामध्ये मोठा दबदबा आहे. सुधीर सोपल यांच्याकडून आर्यनला शिस्तबध्द व्यवस्थापनाचे धडे मिळत आहेत.

दिलीप सोपल यांच्या आजपर्यंतच्या वाटचालीमध्ये सुधीरभाऊ सोपल यांनी पदद्यामागून मोठी ताकद निर्माण केली. आर्यन सोपल यांचे पिता योगेश सोपल यांनी नगराध्यक्ष पद भूषवलेले आहे. योगेश सोपल यांची प्रतिमा चांगली आहे. त्यांच्याकडून आर्यन यांना सुसंस्कृतपणाचा वारसा मिळालेला आहे. घरामध्येच मिळालेला या बाळकडूचे आर्यन अमृतामध्ये रूपांतर करणार का हा प्रश्न आहे.

बार्शी तालुक्याच्या राजकारणात सध्या आर्यन यांना शिरकाव करावयाचा आहे. त्यांच्या समोर मोठी आव्हाने आहेत. राज्यातील राजकारणातही मोठे फेरबदल झाले आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुका अगदी तोंडावर आहेत. बार्शी तालुक्यात आमदार राऊत यांच्या रूपाने सोपल गटासमोर प्रबळ विरोधक आहेत. अशा परिस्थितीमध्ये आर्यन सोपल यांना आपल्या नेतृत्वाचा करिष्माच दाखवावा लागणार आहे. बार्शी तालुक्याच्या सतत चढउतारांनी भरलेल्या राजकारणात पाय रोवणे सोपे नाही. राजकीय संदर्भ बदलले आहेत. पण दिलीप सोपल यांनी ज्या कौशल्याने तालुका, जिल्हा आणि राज्याच्या राजकारणात आपले स्थान निर्माण केले. तो एक आदर्श वस्तुपाठ आर्यन यांच्या समोर आहे. दिलीप सोपल या वलयांकित नावाची जादू आता आर्यन सोपल यांच्यासाठी कशी वापरली जाणार याची उत्सुकता बार्शीकरांना आहे. दिलीप सोपल हे बार्शी विधानसभा मतदार संघातून सहा वेळा आमदार म्हणून निवडून आले. त्यांनी कॅबिनेट मंत्री पदापर्यंत गगन भरारी घेतली.

सोपल हे दोन वेळा अपक्ष आमदार म्हणून निवडून आहे. तेंव्हा अतिशय आव्हानात्मक परिस्थिती होती. मात्र सोपल यांनी आपल्या मुत्सद्दीपणाची चुणूक त्यावेळी दाखवली होती. मात्र आता सोपल गटासमोरच भविष्यात फार मोठी राजकीय कसोटी आहे. राऊत यांची राजकारणातील ताकद वाढलेली आहे. सध्या त्यांना सत्ताधारी भाजपचे पाठबळ आहे. राऊत हे राज्यातील भाजपचे सर्वेसर्वा देवेंद्र फडणवीस यांचे सोलापूर जिल्ह्याच्या राजकारणातील समर्थक आमदार मानले जातात. त्यांची सरकार दरबारी आपले वजन सिध्द करण्याची जोरदार तयारी सुरू आहे. अशा परिस्थितीमध्ये गेल्या नगरपालिका, पंचायत समिती, बाजार समिती, विधानसभा या निवडणुकांमध्ये पराभवाचा फटका बसल्यामुळे सोपल गटावर काहिसे उदासीनतेचे सावट आहे.

### टॉनिक देणार का?

दिलीप सोपल यांच्या बरोबर तीन पिढ्यांचे कार्यकर्ते आहेत. त्यांची अनुभवाची शिदोरी आर्यन सोपल यांना उपयोगी पडणार आहे. सोपल गटाला सध्या आवश्यक असलेले राजकीय टॉनिक आर्यन सोपल युवा संघटन उभारून देणार का ? याची उत्कंठा बार्शीकरांमध्ये आहे. त्यामुळे सोपल गटाचे राजकीय पुर्नरूज्जीवन आर्यन सोपल करणार का ? आणि नुकत्याच झालेल्या मेळाव्यात दिलेल्या अभिवचनाप्रमाणे त्यांचा राबता हा बार्शीमध्ये राहणार का हे येणारा काळच ठरवेल.

# फडणवीसांचे कौतूक; पवार- सोनियांवर टीका

## आडम मास्तरांनी वाढवला तिढा

अजित उंब्रजकर

पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या उपस्थितीत कुंभारी येथील रे नगर येथे नुकत्याच झालेल्या कार्यक्रमात मुख्यप्रवर्तक आडम मास्तर यांनी भाजपाचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कौतूक तर केलेच. हे करताना त्यांनी सोनिया गांधी आणि शरद पवार यांच्यावर टीका केली. एकाच कार्यक्रमात भाजपचे कौतूक आणि आघाडीवर टीका करत आडम यांनी माकपच्या भूमिकेबद्दल अनेकांच्या मनात तिढा वाढवला आहे.

आडम मास्तर यांचा महत्वाकांक्षी असणाऱ्या रे प्रकल्पाबाबत पालकमंत्र्यांनी आढावा बैठक घेतली. यामध्ये आडम मास्तर यांनी आपल्या भाषणात या प्रकल्पासाठी तत्कालिन मुख्यमंत्री आणि विद्यमान उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे सहकार्य लाभल्याचे सांगितले. या गृहप्रकल्पाकडे खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे विशेष लक्ष आहे, असेही ते म्हणाले. दुसरीकडे या प्रकल्पासाठी यापूर्वी शरद पवार-सोनिया गांधी यांच्या पर्यंत गेलो.

मात्र त्यांना जे जमले नाही, त्यांच्याकडून अनेक अडचणी आणल्या गेल्या असे सांगितले. आडम मास्तरांच्या या दोन्ही परस्पर वक्तव्याचा राजकीय वर्तुळात मात्र अनेक तर्क- वितर्क काढले जात आहेत. वास्तविक पाहता २०१९ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत आडम मास्तर यांनी भाजपला सहकार्य केल्याची चर्चा आहे. जानेवारी २०१९ मध्ये या गृहप्रकल्पाचे उद्‌घाटनास खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी आले होते, त्यांनी पहिल्या टप्प्यात होणाऱ्या १० हजार घरांच्या चाव्या देण्यासाठीही येण्याचे कबूल केले आहे. यावेळी मोदी यांनी या प्रकल्पासाठी आवश्यक ती मदत देण्याचे आश्वासन देत आडम मास्तरांचे कौतूकही केले होते. त्यामुळे आडम मास्तरांचे झुकते माप भाजपकडे गेल्याचे बोलले जात आहे. आताही वर्ष-सव्वा वर्षावर पुन्हा एकदा लोकसभा निवडणूक आली आहे. भाजपाला खास करून नरेंद्र मोदींच्या दृष्टीने लोकसभा निवडणूक महत्वाची आहे. आडम मास्तरांना या प्रकल्पासाठी जास्तीत जास्त सहकार्य करून पुन्हा एकदा लोकसभेसाठी त्यांना जवळ करण्याचे प्रयत्न भाजपकडून सुरू राहणार आहेत. आता रे नगरच्या प्रकल्पाच्या माध्यमातून आडम मास्तर सुमारे ३० हजार गरिब लोकांना घरे देणार आहेत. त्यामुळे एक मोठे मतांचे पॉकेट आडम मास्तरांजवळ असणार हे भाजपाने हेरले आहे, त्यामुळेच प्रकल्पासाठी निधी देताना, विविध सवलती देताना भाजप हात सैल सोडणार यात शंका नाही. अशातच आडम मास्तरांनी भाजपाचे कौतूक केल्याने ही शक्यता जास्तच बळावली आहे. एकंदरित अचंबित टाकणाऱ्या दोन्ही व्यक्तव्यामुळे आडम मास्तरांची भूमिका आगामी काळात होणाऱ्या आणि भाजपच्या दृष्टीने महत्वाच्या असणाऱ्या लोकसभा निवडणुकीत कोणती राहणार याची उत्सुकता लागली आहे.



### ‘ती’ सल आजही आडम यांच्या मनात

२००४ मध्ये आडम मास्तर यांनी काँग्रेसच्या पाठिंब्यावर शहर मध्यमधून निवडणूक लढवली होती. यावेळी मास्तर विजयी झाले होते. मात्र २००९ मध्ये मात्र काँग्रेसने स्वतंत्र लढत ही जागा प्रणिती शिंदे यांना दिली. येथून त्या विजयी झाली. त्यानंतर सलग तीनवेळा त्यांनी आडम मास्तर यांना पराभूत केली. स्वतःच्या मुलीला उमेदवारी देण्यासाठी सुशीलकमार शिंदे यांनी माकपबरोबरची आघाडी तोडली, ही सल आजही आडम मास्तरांच्या मनात आहे.

### ‘ते’ अदृश्य हात आडम मास्तरांचे असतील का?


लोकसभा निवडणुकीपूर्वी महापलिकेचीही निवडणूक होत आहे. यामध्ये पुन्हा भाजप सत्ता राखण्यासाठी प्रयत्नशिल आहे. दुसरीकडे सेना- काँग्रेस आणि राष्ट्रवादी या महाआघाडीचे आव्हान भाजपपुढे असणार आहे. अशा परिस्थितीत सत्तेसाठी भाजपला काही जागांची कमतरता भासण्याची शक्यता आहे. त्यामुळे विधानसभेत फडणवीसांनी अदृश्य हातांनी आम्हाला मदत केल्याचे सांगितले होते. ते व्यक्तव्य प्रसिद्धही झाले होते. तसे सोलापूर महापालिकेत भाजपला गरज भासल्यास ते अदृश्य हात आडम मास्तर यांचे असण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

# राष्ट्रवादी काँग्रेसची पुरती नामुष्की

डी.एस.गायकवाड

माळशिरस तालुक्यात जिल्हा उपाध्यक्षपदाची निवड केली जाते, ती निवड आठवडाभरात रद्द केली जाते आणि लगेच दोन दिवसात तीच निवड जाहीर केली जाते. यामुळे माळशिरस तालुका राष्ट्रवादी काँग्रेसवर नामुष्कीची वेळ आली असून पक्षाची पुरती नाचकी झाल्याचे चित्र समोर येताना दिसत आहे.

माळशिरस तालुक्यावर भाजपाचे वर्चस्व आहे पण त्यांना प्रतिस्पर्धी म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस कार्य करताना दिसते. माळशिरस तालुका राष्ट्रवादीमध्ये सरळ सरळ दोन गट आहेत, याची प्रचितीही अनेक वेळा आलेली आहे. त्यामुळे या दोन गटात शहकटशहाचे राजकारण चालते हेही उघड आहे मग त्यातून एकमेकांच्या गटातील पदाधिकारी निवडीवरही याचा परिणाम होताना दिसतो. नुकतीच अकलूज येथील एका कार्यकर्त्याची पक्षाने जिल्हा उपाध्यक्षपदावर वर्णी लावली. तसे पत्रही जिल्हाध्यक्ष बळीराम काका साठे यांनी त्यांना दिले पण अवघ्या चार-पाच दिवसातच जाहीररित्या त्यांचे पदही काढून घेतले गेले. यामुळे राष्ट्रवादीतील गटातटाचे राजकारण समोर आले नि चर्चेला उधाण आले.



पद का काढण्यात आले, याबाबत तर्क वितर्क लावले जाऊ लागले. पक्षांमध्ये या निमित्ताने दुफळीचे वातावरण देखील पाहायला मिळाले. सदर निवड झालेल्या व्यक्तीचा राजकीय गेम कुणी केला याबाबतही चर्चा होऊ लागल्या पण अचानक पक्षाने भूमिका बदलली आणि पुनश्च त्या कार्यकर्त्याला जिल्हा उपाध्यक्षपद बहाल करून टाकले. पण यानिमित्ताने पक्षाच्या बदलत्या भूमिकेबाबत साशंकता व्यक्त केली जाऊ लागली. या प्रकारामुळे पक्षावर नामुष्कीची वेळ आली. मुळात तालुक्यात पूर्वीचेच तीन कार्यकर्ते या जिल्हा उपाध्यक्षपदावर कार्य करीत असताना चौथी व्यक्ती या पदावर कशासाठी नेमली गेली आहे? अशी कुजबुज देखील या निमित्ताने पक्षांतर्गत सुरू असताना दिसते आहे. आता चार -चार जिल्हा उपाध्यक्ष राष्ट्रवादीत कार्यरत आहेत. याचाही परिणाम भविष्यातील निवडणुकात होतोय का? हेही पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. अन्यथा ही पदे फक्त मिरवायची साधने ठरतील, यात शंका नाही. कोणीही पक्षासाठी ध्येयधोरणे आखताना दिसत नाही. फक्त निवडणूक आली की समोरच्या शक्ती विरोधातील नाराज गटांना एकत्रित करायचे नि निवडणुकीचे रणशिंग फुंकायचे यामुळे पक्षाची पुरती वाट लागली आहे. त्यातच अशा पदाच्या निवडी जाहीर करणे, पुन्हा रद्द करणे आणि पुन्हा त्याच पदाच्या घोषणा करणे त्यामुळे पक्षाला खाली मान घालायची वेळ आली आहे. कार्यकर्त्यात यामुळे संभ्रमावस्था वाढली आहे. मुळात पक्ष पहिल्यांदा असतो नंतर पद असते पण पदच प्रथम समजून अविर्भाव गाजविला तर पक्षाची वाताहत होणार हे निश्चित.